मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

» मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

» पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

» नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

» वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक » बुधवार, १६ एप्रिल २०२५ » वर्ष: ६ » अंक:११८ » पाने-८ » किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## राम मंदिर बॉम्बने उडवून देण्याची धमकी

**अयोध्या, दि. १५ प्रतिनिधी**

अयोध्येतील राम मंदिर बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली. अयोध्येतील राम मंदिर ट्रस्टसह उत्तर प्रदेशातील १०-१५ जिल्ह्यांतील जिल्हा दंडाधिकाऱ्यांनाही अधिकृत ईमेलवर धमकीचा मेल आला. याप्रकरणी अयोध्येच्या सायबर पोलीस ठाण्यात एफआयआर दाखल करण्यात आला. हा ईमेल तामिळनाडूतून आल्याचे सांगण्यात आले आहे. याप्रकरणी सायबर सेल अधिक तपास करीत आहेत. सोमवारी रात्री रामजन्मभूमी ट्रस्टच्या मेलवर धमकीचा मेल आला होता. यासह राज्यातील १० ते १५ जिल्हा दंडाधिकाऱ्यांनाही अयोध्यातील राम मंदीर बॉम्बने उडवून देण्याचा मेल आला. या मेलमध्ये मंदिराची सुरक्षा वाढवण्याचे लिहिले आहे. हा मेल तामिळनाडून आल्याचे सांगण्यात आले. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून सायबरने पुढील तपासाला सुरुवात केली. अयोध्यासह बाराबंकी आणि इतर शेजारील जिल्ह्यांनाही हाय अलर्टवर ठेवण्यात आले.

### अग्राग्रलेख
## खरीखरी
## सैतानांचा शांती संदेश

नक्षलवाद्यांचा पूर्णतः बिमोड होण्याची वेळ आलेली आहे. कारण १९७६ सालापासून पश्चिम बंगालच्या नक्षलवादी गावांमधून सुरू झालेली ही नक्षलवादी ठिणगी आता हळूहळू विझत असल्याचे दिसते आहे. आपल्या देशाच्या जवळपास १२० जिल्ह्यांमध्ये आपल्या क्रूरतेची परमावधी गाठलेल्या या नक्षलवादी मंडळींनी अत्यंत क्रूरपणे कितीतरी बडे नेते, स्थानिक नेते, पोलीस अधिकारी, सामान्य पोलीस तसेच पॅरामिलिटरी फोर्स मधील जवानांची हत्या केली. त्यांनी केलेल्या हत्याकांडाची कोणतीही गणतीच नाही. गेल्या काही वर्षांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नक्षलवाद्यांना संपवण्याचे कार्य गृहमंत्री अमित शहा यांना सोपवले. त्यांनी गेल्या पाच वर्षात नक्षलवाद्यांचे थोबाड असे काही फोडले आहे की, त्यांना म्हणजेच नक्षलवाद्यांना आपले तोंड दाखवायलाही जागा सोडलेली नाही. आता देशातील फक्त सहा जिल्ह्यांमध्ये नक्षलवादी उरलेले आहेत. त्यात आपल्या महाराष्ट्रातील एकमेव गडचिरोली हा जिल्हा आहे. या नक्षलवाद्यांचा मोठा म्होरक्या तेलगू भाषिक आहे. याने तेलगूमध्ये सरकारकडे 'शांतीवार्ता' करण्यासाठी अर्ज केला आहे. आता सरकारला या क्रूरकर्म्यांच्या बरोबर वार्ता करण्याची गरजच कुठे उरली आहे. गेल्या दोन-तीन वर्षात ४०० पेक्षा अधिक अत्यंत क्रूरकर्मा आणि नामचीन असलेले नक्षलवादी ठार झालेले आहेत. कितीतरी नामचीन आणि फक्त नावाने भयकंप उडवणाऱ्या अनेक नक्षलवाद्यांवर लाखोंचे बक्षीस आहे, अशा अनेक नक्षलवाद्यांनी पोलिसांसमोर आत्मसमर्पण केलेले आहे. आता पोलिसांची दहशतच इतकी मोठी आहे आणि त्यांच्याकडे इतकी जबरदस्त व्यवस्था आहे की, हे नक्षलवादी जिथे कुठे लपून असतील. तिथे डायरेक्ट ॲक्शन पोलीस दलाच्या तुकड्या घेत असतात. जिथे जिथे त्यांचे अड्डे होते. त्याठिकाणी या मंडळींनी कोणतेही काम होऊ दिले नव्हते. तयार झालेले रस्ते आणि महामार्ग खोदून खोदून नष्ट करण्यात आले. त्यांच्या धाकामुळे नक्षल प्रभावित भागात एकही उद्योग उभारू शकला नाही. आता हे नक्षलवादी अगदीच दिगंबर झाल्यामुळे त्यांना शांतीचे महत्त्व कळलेले असावे. ज्या गडचिरोली जिल्ह्यात बदली होणे म्हणजे शिक्षा होती. त्या जिल्ह्यात सुरजागड सारखा महाप्रचंड प्रकल्प सुरू होत आहे. देशाच्या विकासासाठी या नक्षलवाद्यांना ठेचणे आवश्यकच होते. हे नक्षलवादी जनतेच्या भल्यासाठी काहीच करत नव्हते असे दिसून आलेले आहे. लाखो करोडोंच्या खंडण्या घेणे आणि सामान्य जनतेला धाकात ठेवणे हेच यांचे काम होते. देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी आता उरलेल्या नक्षलवाद्यांना शरण येण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळेच सैतानी कारवाया करणाऱ्या नक्षलवाद्यांनी सरकारकडे शांती संदेश पाठवलेला आहे. हीच सरकारच्या शांतीवार्तेची फलश्रुती आहे. त्याबद्दल सरकारचे धन्यवाद!

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# नॅशनल हेराल्डप्रकरणी आरोपपत्रात सोनिया आणि राहुल गांधींचे नाव

**नवी दिल्ली, दि. १५ वृत्तसंस्था**

नॅशनल हेराल्ड प्रकरणात मनी लॉंड्रिंगच्या आरोपाखाली अंमलबजावणी संचालनालयाने कॉंग्रेस नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी आणि इतरांविरुद्ध आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. विशेष न्यायाधीश विशाल गोगणे यांनी ९ एप्रिल रोजी दाखल केलेल्या आरोपपत्राची दखल घेतली आणि पुढील सुनावणी २५ एप्रिल रोजी होणार आहे.

आरोपपत्रात कॉंग्रेस नेते सॅम पित्रोदा आणि सुमन दुबे यांचाही आरोपी म्हणून समावेश आहे. दरम्यान, कॉंग्रेसशी संबंधित नॅशनल हेराल्ड वर्तमानपत्र आणि असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड (एजेएल) यांच्या मालकीची ६६१ कोटी रुपयांची स्थावर मालमत्ता ताब्यात घेण्यासाठी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) ११ एप्रिल रोजी नोटिसा बजावल्या.



या प्रकाशन संस्थांविरोधात सुरू असलेल्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणाच्या चौकशीचा भाग म्हणून ही कारवाई करण्यात आल्याची माहिती ईडीने शनिवारी दिली.


"नॅशनल हेराल्डची संपत्ती जप्त करणे म्हणजे शासनाचा मुखवटा पांघरून राज्यप्रायोजित गुन्हा करणे आहे. सोनिया गांधी, राहुल गांधी आणि अन्य लोकांविरोधात दाखल केलेले आरोपपत्र म्हणजे पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांकडून सुडबुद्धीचा आणि धमकावण्याचा प्रयत्न आहे. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस आणि आमचं नेतृत्व गप्प बसणार नाही. सत्यमेव जयते!", अशी प्रतिक्रिया कॉंग्रेसचे प्रवक्ते जयराम रमेश यांनी दिली.

पंडित जवाहरलाल नेहरू यांनी स्थापन केलेले 'नॅशनल हेरॉल्ड' वृत्तपत्र २००८ साली बंद पडले. पं. जवाहरलाल नेहरू यांनी ब्रिटिश साम्राज्यशहांना विरोध करण्यासाठी १९३८ मध्ये सुरू केलेले हे कॉंग्रेसचे मुखपत्र होते. हे वृत्तपत्र बंद पडल्यानंतर 'यंग इंडिया' कंपनीने २०१० साली ते विकत घेतले. यंग इंडिया लिमिटेड या कंपनीची स्थापना नोव्हेंबर २०१० साली झाली होती. या कंपनीमध्ये सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांचा सर्वात मोठा म्हणजे ७६ टक्के वाटा होता. नॅशनल हेराल्ड हे वृत्तपत्र २००८ पासून आर्थिक तोटा होत असल्याचं कारण देत बंद करण्यात आलं होतं. कॉंग्रेसने पुढे जाऊन 'एजेएल'ला ९० कोटी रुपयांचे व्याजमुक्त कर्ज दिले. पक्षाने सांगितले की, हे पैसे वृत्तपत्राला परत आणण्यासाठी प्रक्रिया सुरू करण्यात मदत करण्यासाठी होते. तथापि, वृत्तपत्राचे पुनरुज्जीवन होऊ शकले नाही आणि एजेएल कॉंग्रेसचे कर्ज फेडण्यात अपयशी ठरले.

# यंदा १०५ टक्के पाऊस - हवामान विभाग

**नवी दिल्ली, दि. १५ वृत्तसंस्था**

संपूर्ण देशाचे आणि प्रामुख्याने शेतकऱ्यांचे लक्ष लागून राहिलेल्या मोसमी पावसाची आनंद वार्ता भारतीय हवामान विभागाने दिली आहे. प्रशांत महासागरातील एल निनो स्थिती तटस्थ आहे. संपूर्ण मोसमी पावसाच्या काळात एल निनो सक्रीय होण्याची स्थिती नाही. हिंदी महासागरीय द्विध्रुविताही तटस्थ आहे. डिसेंबर – मार्च या काळात युरोशिया आणि हिमालयात बर्फाच्छादित भाग सरासरीपेक्षा कमी राहिला त्यामुळे यंदा सरासरीपेक्षा जास्त १०५ टक्के पाऊस पडण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तविला आहे. प्रशांत महासागरात ला निना अथवा एल निनो, अशी कोणतीही स्थिती सक्रीय नाही. ला निना नंतरची निष्क्रीय स्थिती निर्माण झाली आहे. संपूर्ण पावसाळ्यात म्हणजे जून ते सप्टेंबर, या चार महिन्यांत एल निनोची स्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच हिंदी महासागरीय द्विध्रुविता ( आयओडी) स्थितीही निष्क्रीय आहे. पावसाळ्यात ती सक्रीय होण्याची स्थिती नाही. तसेच युरोप आणि आशियातील बर्फाच्छादित प्रदेश सरासरीपेक्षा कमी राहिला आहे. बर्फाच्छादित प्रदेश कमी राहिला तर मोसमी पावसाला पोषक स्थिती असते. त्यामुळे देशात यंदा सरासरीपेक्षा जास्त १०५ टक्के पावसाचा अंदाज आहे.



देशात १९७१ ते २०२० च्या तुलनेत सरासरी ८७ सेमी पाऊस पडतो. त्यात पाच टक्क्यांनी वाढ होण्याचा अंदाज आहे. लडाख, ईशान्य भारत आणि तमिळनाडू वगळता देशाच्या अन्य भागात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याचा अंदाज. या वेळी पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव एम. रविचंद्रन, भारतीय हवामान विभागाचे महासंचालक मृत्युंजय महापात्रा आणि शास्त्रज्ञ आर. के. जेनामणी उपस्थित होते.

प्रशांत महासागरातील ला निना स्थिती नैऋत्य मोसमी पावसाला पोषक असते. ला निना सक्रीय असताना सामान्यपणे भारतीय उपखंडात सरासरी इतका किंवा काहीसा जास्त पाऊस पडतो. एल निनो स्थिती प्रतिकूल असते. एल निनो सक्रीय असताना सामान्यपणे सरासरीपेक्षा कमी पाऊस पडतो. यंदा प्रशांत महासागरात निष्क्रीय स्थिती असणार आहे. त्यामुळे नैऋत्य मोसमी पावसाची स्थिती सामान्य राहील किंवा सरासरी इतका पाऊस पडेल, असा अंदाज बांधला जात आहे. हिंदी महासागर द्विध्रुविता ही तटस्थ राहणार आहे. ही तटस्थता मोसमी पावसाच्या पथ्यावर पडणार आहे. हवामान विभागाने आज जाहीर केलेल्या अधिकृत अंदाजानुसार निष्क्रीय स्थिती फायदेशीर ठरून सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याचा अंदाज आहे

## राज्य मंत्रिमंडळाने घेतले सात महत्त्वाचे निर्णय



**गजानन तुपे**
**मुंबई, दि. १५ प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक नुकतीच मुंबईत पार पडली. या बैठकीत सात महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले असून प्रामुख्याने गृह, महसूल, नगरविकास, विधी व न्याय विभागांना झुकतं माप मिळालं आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडील नगरविकास विभागांतर्गत सर्वाधिक तीन निर्णय घेण्यात आले आहेत. स्थावर मालमत्तांच्या हस्तांतरणांसाठीच्या नियमांमध्ये बदलास मान्यतेपासून ते लातूरच्या पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतनमध्ये अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या बैठकीस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील अनेक मंत्री व वरिष्ठ सनदी अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्र्यांच्या गृह विभागांतर्गत राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाच्या निर्देशानुसार कैद्याच्या कोठडीतील मृत्यूप्रकरणी भरपाई देण्याच्या धोरणास या बैठकीवेळी मंजूरी देण्यात आली आहे.

**१. विधी व न्याय विभाग**

चिखलोली-अंबरनाथ (जिल्हा ठाणे) येथे दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय स्थापन करणार व त्याअनुषंगाने पदे मंजूर करण्यात आली आहेत.

**२. गृह विभाग**

राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाच्या निर्देशानुसार कैद्याच्या कोठडीतील मृत्यूप्रकरणी भरपाई देण्याच्या धोरणास मंजूरी.

**३. नगरविकास विभाग**

नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरीतील स्थावर मालमत्तांच्या हस्तांतरणांसाठीच्या नियमांमध्ये बदलास मान्यता

**४. नगरविकास विभाग**

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये सुधारणा. नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी क्षेत्रातील मालमत्ता करावरील दंड अंशतः माफ करून कर वसूली व्हावी यासाठी अभय योजना लागू करण्याचा निर्णय आजच्या बैठकीत घेण्यात आला.

**५. नगरविकास विभाग**

नगर परिषदा, नगरपंचायती, औद्योगिक नगरींच्या नगराध्यक्षांना बहुमताने हटवण्याच्या तरतुदींस मान्यता, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये सुधारणा करणार.

**६. महसूल व वन विभाग**

भूमिसंपादन, पुनर्वसन पुनर्वसाहत करताना उचित भरपाईचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ३० (३), ७२ व ८० मध्ये भूसंपादनाचा मोबदला विलंबाने अदा करताना आकारण्यात येणाऱ्या व्याजदरांच्या तरतुदींमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय

**७. उच्च व तंत्रशिक्षण विभाग**

लातूरच्या पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन मध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## तुळजापूर ड्रग्ज प्रकरणात १०,००० पानी दोषारोपपत्र दाखल

**धाराशिव, दि. १५ प्रतिनिधी**

तुळजापूरमध्ये गेल्या काही दिवसांपासून ड्रग तस्करीची मोठी चर्चा आहे .१५ फेबुवारीला तुळजापूर तालुक्यात २.५ लाख रुपये किमतीचे एमडी ड्रग जप्त करण्यात आले होते. या प्रकरणात गेल्या दोन महिन्यांपासून अनेक उलगडे होत आहेत. लाखो भाविकांच्या तुळजापुरात ड्रग तस्करीमध्ये पुजारीच पेडलर असल्याचं समोर आलं होतं. दरम्यान, आता तुळजापूर ड्रग्ज प्रकरणात दोषारोपपत्र दाखल करण्यात आलं आहे. तब्बल १० हजार पानांचे दोषारोपपत्र धाराशिव जिल्हा सत्र न्यायालयात दाखल झाले आहे. तुळजापूर ड्रग्ज प्रकरणात ३५ आरोपी असून आरोपींची संख्या वाढण्याची शक्यता आहे.

तुळजापूर ड्रग्ज प्रकरणात ३५आरोपी असून आरोपींची संख्या वाढण्याची शक्यता आहे. लाखो भाविकांच्या तुळजापुरात ड्रग तस्करी मध्ये पुजारीच पेडलर असल्याचं समोर आलो होतं. त्यानंतर अमली पदार्थाच्या तस्करी प्रकरणात राजकीय कनेक्शन समोर आल्यानंतरआतापर्यंत १४ आरोपींना अटक करण्यात आली असून २१ आरोपी फरार आहेत.ड्रग्ज तस्करीत कोणाचे रोल काय दोषारोपपत्रात नमूद करण्यात आले आहे. बँक ट्रांजेक्शन, आरोपींचा एकमेकांशी संपर्क कसा झाला दोषआरोपपत्रात नमूद असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. दोषारोपपत्रात आरोपींची क्रमवारी निश्चित नाही, प्रकरणात कोणाचा रोल काय हे ठरवण्यात आल्याची माहिती आहे. ड्रग्ज प्रकरणातील आरोपी संगीता गोळे आणि इतर आरोपींचा संपर्क कसा झाला, आरोपींची साखळी कशी तयार झाली याबाबत दोषारोपपत्र महत्त्वाची माहिती समोर आली आहे. यात आरोपीचे जबाब, सीडीआरची माहिती तसेच मुंबई, सोलापूर, पुणे येथील तस्करी प्रकरणात संबंध असल्याची दोषारोपपत्र माहिती आहे.

## पाठलाग करून भाजपा पदाधिकाऱ्यावर कोयत्याचे वार

**बीड, दि. १५ प्रतिनिधी**

माजलगाव शहरातील स्वामी समर्थ केंद्र परिसरात मंगळवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास एका युवकाच्या खुनाच्या घटनेने माजलगाव शहर हादरले आहे. बाबासाहेब प्रभाकर आगे असे मृताचे नाव आहे. ते भाजपाचे माजलगाव तालुका सरचिटणीस होते. दरम्यान, आरोपी नारायण शंकर फपाळ हा पोलिस ठाण्यात शरण आल्याची माहिती आहे.

प्राथमिक माहिती नुसार, दुपारी माजलगाव शहराच्या बाहेरून जाणाऱ्या बायपास रस्त्यावर बाबासाहेब आगे याचा हातात कोयता घेऊन नारायण शंकर फपाळ हा पाठलाग करत होता. आगे जिवाच्या आकांताने आगे पळत पळत माजलगाव बस स्थानकापासून जवळच असलेल्या शाहूनगरच्या बाजार रस्त्यावर आले. मात्र, तेथे जवळच असलेल्या स्वामी समर्थ केंद्राच्या बाजूला असलेल्या रस्त्यावर फपाळ याने बाबासाहेब आगे यांना गाठलेच. त्यानंतर काही कळायच्या आत नारायण फपाळ याने आगे यांच्यावर कोयत्याने सपासप वार केले. प्रत्यक्षदर्शीने नुसार फपाळ याने अगोदर आगे यांच्या पोटात वारकरून नंतर दोन वार डोक्यात केले. त्यानंतर फपाळ तेथून पसार झाला. नागरिकांनी माहिती दिल्यानंतर पोलिसांनी घटनेस्थळी धाव घेतली. पाहणी करून घटनास्थळाचा पंचनामा करत पोलिसांनी बाबासाहेब आगे यांना गंभीर जखमी अवस्थेत ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. येथे तपासून डॉक्टरांनी आगे यांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. दरम्यान, हल्ला केल्यानंतर आरोपी नारायण शंकर फपाळ पोलिस ठाण्यात जाऊन आत्मसमर्पण केले. त्याने आगे यांचा खून का केला याबाबत अद्याप माहिती मिळू शकली नाही. पोलिस अधिक तपास करत आहेत. मात्र, भर दिवसा रस्त्यावर हत्येच्या थरारक घटनेने माजलगाव शहर हादरले आहे.

# भाजप २०३४ मध्ये देशात नवे संविधान आणणार
## कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा दावा

**मुंबई, दि. १५ प्रतिनिधी**

देशात नवीन संविधान निर्मितीची प्रक्रिया सुरु असून, २०३४ साली नवीन संविधान लागू करण्यासाठी बैठका सुरु असल्याचा खळबळजनक दावा कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना व्यक्तिशः पक्ष संदर्भात आणि विचारधारेशी संबंधित भारताचं संविधान मान्य नसल्याचे सपकाळ म्हणाले. त्यामुळं संघ आणि भाजपच्या बगलबच्चांनी नवीन संविधान निर्मितीची प्रक्रिया सुरु केल्याचे सपकाळ म्हणाले.

२०३४ साली देशात नवीन संविधान लागू करण्यासाठी बैठकाही सुरु झाल्या असल्याचा दावा आज कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्यावर चौफेर टीकाही केली आहे. पुणे गर्भवती महिला मृत्यू प्रकरणात मंगेशकर कुटुंबियांनी महाराष्ट्राची माफी मागावी असंही त्यांनी म्हटलं आहे.

गेल्या ११ वर्षात पंतप्रधान राहूनही मोदींनी सांगण्यासारखं काहीचं केलं नसल्याने काल त्यांनी आंबेडकरांचा मुद्दा उपस्थित केल्याचे सपकाळ म्हणाले. भ्रम पसरवणे, कॉंग्रेसला बदनाम करणं एवढेच मोदींनी सुरु केलं आहे. पंतप्रधानांचा असं वर्तन हे अशोभनीय असल्याचे मत हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केले. पंडित जवाहरलाल नेहरुंनी त्यांच्या मंत्रिमंडळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना थेट सन्मानाचे कायदामंत्रीपद दिलं होतं हे मोदींनी विसरु नये असंही सपकाळ म्हणाले.

नाशिकच्या काळाराम मंदिरात डॉ. बाबासाहेबांना दर्शन घेऊ दिलं नाही हे दुर्दैव आहे. दलित ओबीसी आणि कॉंग्रेसमध्ये मोदी दरी निर्माण करु बघत आहे. समाजातील वेगवेगळ्या घटकांना मोदी फॅसिस्ट करत आहेत. आरएसएस जनसंघ व आजच्या भाजपच्या लोकांनी बाबासाहेबांना नेहमीच असन्मानित केलं आहे. मनुस्मृतिद्वारे संविधान लिहिलं जावं व मनुस्मृतिद्वारे संविधान चालावं असं



गोळवलकर गुरुजींनी लिहिलेलं "बंच ऑफ थॉट" हे भाजपच " बायबल " आहे असा टोलाही सपकाळ यांनी भाजपला लगावला. भाजपला आणि संघाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विद्वान आहेत हे मान्यच नाही. भाजपाला जर इतकं वाटत असेल तर त्यांनी गोळवलकर गुरुजींनी लिहिलेलं बंच ऑफ थॉटची होळी करावी असेही सपकाळ म्हणाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतः कधीही कॉंग्रेसमुळं माझा पराभव झाला असं म्हटलं नाही. उलट त्यांनी त्यांच्या पराभवाच्या कारण डांगे व विनायक दामोदर सावरकर यांच्यावर फोडल्याचे सपकाळ म्हणाले.

मोदींना व्यक्तिशः, पक्ष संदर्भात आणि विचारधाराशी संबंधी भारताच संविधान मान्य नाही. संविधान लिहिताना ते मनुस्मृती संबंधित लिहिल्या गेलं पाहिजे असं संघाने आणि जनसंघाने सांगितलं होतं याचे पुरावे उपलब्ध आहेत. ते समतेच्या विरोधात होते. सध्या देशात नवीन संविधान निर्मितीची प्रक्रिया संघ आणि भाजपच्या बगलबच्चांनी सुरु केली आहे. २०३४ साली आम्ही नवीन संविधान लागू करू यासाठी त्यांच्या बैठकाही सुरू आहेत. असे सपकाळ म्हणाले. २०२४ च्या निवडणुकीत आपकी बार ४०० पार हे जे सुरु होतं तर भाजपचेच उमेदवार सांगत होते की आम्हाला संविधान बदलायचा आहे आणि अजूनही ते त्यावर ठाम आहेत. भाजपला जर संविधान बदलवायचं आहे तर त्यांनी थेट भूमिका घ्यावी "मुह मे राम बगल मे छुरी.." असं करु नये असेही सपकाळ म्हणाले.

# महागाईच्या आघाडीवर मोठा दिलासा
## घाऊक महागाई सहा महिन्यांच्या नीचांकी पातळीवर

**नवी दिल्ली, दि. १५ वृत्तसंस्था**

देशातील सामान्य जनतेला महागाईच्या आघाडीवर मोठा दिलासा मिळाला आहे. अन्नपदार्थांच्या किमतीत झालेल्या घसरणीमुळे घाऊक किंमत आधारित महागाई फेब्रुवारीतील २.३८% वरून मार्चमध्ये २.०५% पर्यंत कमी झाली. मंगळवारी जाहीर झालेल्या सरकारी आकडेवारीत ही माहिती देण्यात आली. मार्चमध्ये घाऊक महागाई सहा महिन्यांच्या नीचांकी पातळीवर आली आहे. मात्र, घाऊक किंमत निर्देशांक (WPI) आधारित महागाई वार्षिक आधारावर वाढली आहे. मार्च २०२४ मध्ये हा आकडा ०.२६ टक्के होता.

उद्योग मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनानुसार, अन्न उत्पादने, इतर उत्पादन, वीज आणि कापड उत्पादन इत्यादींच्या किमती वाढल्यामुळे मार्च २०२५ मध्ये महागाई वार्षिक आधारावर वाढली. घाऊक किंमत निर्देशांकाच्या आकडेवारीनुसार, अन्न महागाई फेब्रुवारीमध्ये ३.३८% वरून मार्चमध्ये १.५७% पर्यंत कमी झाली. याचे मुख्य



कारण म्हणजे भाज्यांच्या किमतीत झालेली मोठी घसरण. मात्र, उत्पादित उत्पादनांमधील महागाई फेब्रुवारीमध्ये २.८६% होती. तर मार्चमध्ये ती ३.०७% वर पोहोचली. इंधन आणि वीज यांच्या किमतीतही वाढ झाली आणि मार्चमध्ये ती ०.२०% वर राहिली.

मार्चमध्ये बटाट्यातील घाऊक महागाई दर -६.७७ टक्के राहिला आहे. तो फेब्रुवारीमध्ये २७.५४ टक्के होता. त्याच वेळी कांद्याचा घाऊक महागाई दर फेब्रुवारीतील ४८.०५ टक्क्यांवरून २६.६५ टक्क्यांवर आला आहे. मार्चमध्ये अंडी, मांस आणि माशांमधील घाऊक महागाई फेब्रुवारीतील १.४८ टक्क्यांवरून ०.७१ टक्क्यांवर आली. फेब्रुवारीमध्ये भाज्यांच्या घाऊक किमतीतील महागाई दर -५.८० टक्क्यांवरून मार्चमध्ये -१५.८८ टक्क्यांवर आला. मार्चमध्ये धान्यांचा घाऊक महागाई दर फेब्रुवारीतील ६.७७ टक्क्यांवरून ५.४९ टक्क्यांवर आला. या कालावधीत मुख्य चलनवाढीचा दर फेब्रुवारीमध्ये १.३० टक्के होता, जो १.५ टक्के होता.

महागाईत घट आणि वाढीतील मंदीची शक्यता लक्षात घेऊन आरबीआयने एप्रिलच्या बैठकीत सलग दुसऱ्यांदा रेपो दरात ०.२५ टक्क्यांची कपात केली. यासह रेपो दर आता ६ टक्क्यांवर आला आहे. या वर्षाच्या सुरुवातीला तो ६.५ टक्के होता. रिझर्व्ह बँकेने आपल्या टिप्पणीत आर्थिक वर्ष २०२६ साठी भारताचा विकासदराचा अंदाज पूर्वीच्या ६.७ टक्क्यांवरून ६.५ टक्के केला आहे. यामुळे फेब्रुवारीमध्ये अंदाजित ४.२ टक्क्यांवरून महागाईचा अंदाज ४ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला आहे.

## महाराष्ट्र केसरीच्या पंचांना मोठा धक्का
# नितीश कबालियेंचे निलंबन

**अहिल्यानगर, दि. १५ प्रतिनिधी**

महाराष्ट्र केसरी स्पर्धेच्या उपांत्य फेरीचे पंच नितीश कबालिये यांचे तीन वर्षांसाठी निलंबन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघटनेचे अध्यक्ष रामदास तडस यांनी याबाबत माहिती दिली आहे. अहिल्यानगरमध्ये २९ जानेवारी ते २ फेब्रुवारी दरम्यान ६७ वी वरिष्ठ राज्य अजिंक्यपद आणि महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा पार पडल्या होत्या. यामध्ये गादी विभागातील अंतिम फेरीच्या कुस्तीमध्ये पृथ्वीराज मोहोळविरुद्ध शिवराज राक्षे यांच्या चितपटीच्या निर्णयावरुन मोठा गदारोळ निर्माण झाला होता.


महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या वतीने ६७वी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा अहिल्यानगर येथे पार पडली होती. सेमी फायनलच्या गादीच्या कुस्तीमध्ये पृथ्वीराज मोहोळ आणि शिवराज राक्षे यांची कुस्ती झाली. त्यामध्ये पृथ्वीराज मोहोळ विजयी झाला. त्या ठिकाणी वाद झाला बाद झाल्यानंतर त्या ठिकाणी तीन पंच तीन साईड पंच एक पंच अशी चार जणांची समिती राहते. त्या ठिकाणी आम्ही चौकशीला पुढे जाण्याकरीता एक कमिटी नेमली विलास कचुरे आंतरराष्ट्रीय पंच आहेत. त्यांच्या अध्यक्षतेखाली आम्ही कमिटी नेमली. त्या कमिटीमध्ये शिवराज राक्षे तर दोषी आहेच, परंतु त्या ठिकाणी नितीश कबलीये हा पंच दोषी आढळले आहेत. त्यामुळे पंच नितीश कबलीये यांना देखील तीन वर्षासाठी आम्ही निलंबित केले आहे. राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत कुठेही त्यांना पंचगिरी करता येणार नाही, असे रामदास तडस यांनी सांगितले. त्यांनी सात दिवसात अहवाल सादर करावा. तर पुन्हा आम्ही कमिटी नेमू आणि त्यात दोषी नसेल तर पुन्हा विचार होईल. आज मात्र तीन वर्षांसाठी पंच सतीश कबालिये यांना निलंबन केले आहे, अशी माहिती रामदास तडस यांनी दिली.

## बोगस जन्म दाखले प्रकरणी परळीचे तहसीलदार, नायब तहसीलदारांची चौकशी करा - सोमय्या

**परळी, दि. १५ प्रतिनिधी**

पुरावे नसताना बोगस जन्म दाखले देण्याचा प्रकार बीड जिल्ह्यातील तीन ठिकाणी उघडकीस आला आहे. परळीतील महसूल प्रशासन यात आघाडीवर असल्याचा आरोप भाजप नेते किरीट सोमय्या यांनी आज केला. सोमय्या यांनी परळी पोलीस ठाण्यात तब्बल तीन तास ठिय्या मांडून तहसीलदार, नायब तहसीलदार, नगरपालिका प्रशासन आदी सर्व संबंधितांविरोधात गुन्हा दाखल करून सखोल चौकशी करण्याची मागणी केली. यावर याप्रकरणी दोन- तीन दिवसांत परळीत गुन्हा दाखल करण्यात येईल, असे आश्वासन पोलीस अधिकाऱ्यांनी आपल्याला दिल्याचे सोमय्या यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले.

सोमय्या हे आज सकाळीच परळी



दाखल झाले. परळीत जन्म दाखले देताना मोठ्या प्रमाणावर घोटाळे व बोगसगिरी झालेली आहे. 40-50 वर्षानंतर अनेकांना कुठलेही निकष न पाहता, कोणत्याही सुनावण्या न करता, पुरेसे पुरावे नसताना बिनधास्तपणे जन्म दाखले देण्यात आले आहेत. अशी 60-70 उदाहरणे सप्रमाण त्यांनी महसूल, नगरपालिका व पोलीस प्रशासनाला दाखवली. परळी वैजनाथ येथून जवळपास दाखल झालेल्या 1389 अर्जांपैकी केवळ 11 अर्ज हे फेटाळल्याचे दिसते. मात्र, जे 1378 अर्ज मंजूर करून जन्म दाखले जारी करण्यात आले आहेत. त्यात पुरेसे पुरावे नसल्याचे दिसते.

तसेच नगरपालिकचे प्रतिनिधी सुनावणीच्या वेळी हजर नसतानाही सुनावणीला हजर असल्याचे बहुसंख्य प्रकरणात नमूद करण्यात आलेले आहे. याबाबत परळीच्या तहसीलदारांनाही समाधानकारक अशा प्रकारचा खुलासा करता आलेला नाही. त्यामुळे बिनधास्तपणाने कोणतेही निकष न पाहता, पुरेसे पुरावे उपलब्ध नसतानाही बोगसगिरी करून तहसीलदार, नायब तहसीलदार यांनी हे जन्म दाखले जारी केलेले आहेत, हे स्पष्ट होते.

या प्रकरणाची सखोल चौकशी झाली पाहिजे. यासाठी संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची आपली मागणी होती. त्यासाठी आपण पोलीस प्रशासनाला पुराव्यासह गुन्हा नोंदविण्याची मागणी केली आहे. दोन दिवसांत याची चौकशी करून निश्चित गुन्हा दाखल होईल, असे आश्वासन आपल्याला परळीच्या पोलिस अधिकाऱ्यांनी दिले असल्याचे सोमय्या यांनी सांगितले.

**सोमय्यांना काळे झेंडे दाखवले**

सोमय्या या प्रकरणी येणार असल्याची कुणकुण येथील नागिरकांना लागली होती. बीड परळीच्या मुख्य रस्त्यांवरती अनेक नागरिकांनी त्यांच्या गाडीच्या ताफ्याला काळे झेंडे दाखवून सोमय्या यांच्या या चौकशीचा निषेध केला.

# पनवेल महापालिकेच्या अग्निशमन विभागातर्फे अग्निशमन सेवा सप्ताहाचे आयोजन

## जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविणार

**पनवेल, दि. १५ प्रतिनिधी**



राज्य शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातर्फे दिनांक १४ एप्रिल २०२५ पासून अग्निशमन सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहाचे उद्घाटन आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या हस्ते आज कळंबोली येथील अग्निशमन केंद्रात करण्यात आले.

उद्घाटनप्रसंगी उपायुक्त कैलास गावडे, मुख्य अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडखे, अग्निशमन अधिकारी हरिदास सुर्यवंशी, उप अग्निशमन अधिकारी संदीप पाटील तसेच महापालिकेतील महिला व पुरुष अग्निशमन कर्मचारी उपस्थित होते.

या वेळी आयुक्त मंगेश चितळे यांनी शहीद अग्निशमन जवानांना श्रद्धांजली अर्पण केली. या सप्ताहाच्या दरम्यान नागरिकांमध्ये आग आणि आपत्ती व्यवस्थापनासंदर्भातील जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. तसेच, निवासी, व्यापारी, शैक्षणिक इमारती व गृह निर्माण संस्थांमध्ये अग्निसुरक्षेबाबत मार्गदर्शन, ड्रील्स आणि प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे.

या सप्ताहाचा समारोप २० एप्रिल रोजी मुंबई येथे मुख्य अग्निशमन अधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत राज्यस्तरीय कार्यक्रमाने होणार आहे. त्याचबरोबर पनवेल शहरातील विविध ठिकाणी जनजागृतीपर कार्यक्रम, प्रात्यक्षिके आणि विद्यार्थ्यांसाठी माहितीपर सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे.

नागरिकांमध्ये सुरक्षिततेविषयी सजगता निर्माण करण्याच्या उद्देशाने हे अभियान पनवेल महापालिकेच्या अग्निशमन विभागातर्फे प्रभावीपणे राबविले जाणार आहे.

# अनेक नेत्यांचा भाजपात प्रवेश

## चंद्रशेखर बावनकुळे यांचा काँग्रेसवर हल्लाबोल

**मुंबई, दि. १५ प्रतिनिधी**

भाजपचे प्रदेशाध्यक्ष मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्यावर जोरदार टीका करताना काँग्रेसमधून मोठ्या प्रमाणात पक्षांतर होत असल्याचा दावा केला. मालेगावातील काँग्रेसमधील हिरे परिवारातील प्रशांत हिरे, संजय घाडगे, पांडुरंग बरोरा आणि शिवाजी देशमुख यांनी भाजपात प्रवेश केला आहे. तसेच, राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली श्रीरामपूरमधील १२ नगरसेवकांनीही भाजपात प्रवेश केला. बावनकुळे यांनी या सर्वांचे अभिनंदन करत काँग्रेसला मोठे खिंडार पडणार असल्याचे भाकीत केले. "काही आश्चर्यकारक पक्षप्रवेश काँग्रेसमधून होतील," असेही ते म्हणाले.

बावनकुळे यांनी सांगितले की, भाजपाची प्राथमिक सदस्य संख्या ५१ लाखांवर पोहोचली असून, ती ५० लाखांनी वाढण्याची शक्यता आहे. शिवसेना (उबाठा) बाबत बोलताना त्यांनी उद्धव ठाकरे यांच्याशी कोणतीही चर्चा झाली नसल्याचे स्पष्ट केले. "ठाकरे किंवा शरद पवार यांनी यावे, असा आमचा आग्रह नाही. पण त्यांच्या पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता आहे, त्यामुळे ते आमच्याकडे येत आहेत," असे ते म्हणाले.

कोयता हत्याप्रकरणी बावनकुळे यांनी आरोपींना लवकर अटक करण्याचे आश्वासन दिले. "लोकसभा विस्तारकाची हत्या चुकीची आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यासंदर्भात लक्ष घालत आहेत," असे त्यांनी सांगितले. सिंधुदुर्ग आणि बीड प्रकरणांवरही गृहविभाग चौकशी करत असल्याचे त्यांनी नमूद केले. बीडमधील स्टंटबाजीवर टीका करताना ते म्हणाले, "महाराष्ट्र पोलिस जगातील सर्वोत्तम उदाहरण आहे."

लाडकी बहीण योजनेवर संजय राऊत यांच्या टीकेला उत्तर देताना बावनकुळे यांनी राऊतांवर पलटवार केला. "राऊतांना वेड लागलं आहे. त्यांचे कार्यकर्ते त्यांना सोडून शिंदे किंवा आमच्याकडे येत आहेत. वक्फ सुधारणा विधेयकाला विरोध केल्याने त्यांचे कार्यकर्ते नाराज आहेत. राऊतांनी शिवसेना संपवण्याचा घाट घातला आहे," असा घणाघात त्यांनी केला. हिंदुत्वाच्या मुद्द्यावर बावनकुळे यांनी ठाकरे यांनी काँग्रेसचा विचार स्वीकारल्याने शिवसेना 'किंचितसेना' झाल्याची टीका केली.

काँग्रेस नेते हर्षवर्धन सपकाळ यांच्या संविधान बदलाच्या आरोपांवर बावनकुळे म्हणाले, "संविधान कोणीही बदलू शकत नाही. ही कॅसेट जुनी झाली आहे." भूसंपादनाच्या मोबदल्याबाबत त्यांनी सांगितले की, व्याजासह रक्कम दिली जाईल आणि आता १ टक्का जास्त रक्कम मिळेल.

# कल्याणसारखे ज्ञान केंद्र राज्यभर उभारणार

**ठाणे, दि. १५ प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार जनसामान्यांमध्ये पोहोचवण्याचे महत्वाचे कार्य कल्याण येथे उभारण्यात आलेल्या ज्ञान केंद्रांच्या माध्यमातून खासदार डॉ. श्रीकांत शिंदे करत आहेत. अशी ज्ञान केंद्रे संपूर्ण राज्यात उभारली जातील, अशी घोषणा राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत आणि सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांनी कल्याण येथे केली.

कल्याण पूर्वेत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नातून उभारण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्ञान केंद्राचे लोकार्पण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. रविवारी (दि.13) रोजी कल्याण पूर्वेतील 'ड' प्रभाग समिती कार्यालयाच्या आवारात झालेल्या दिमाखदार सोहळ्यात देशातील आगळ्यावेगळ्या ज्ञान केंद्राचे लोकार्पण झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जीवनपट होलोग्राफी, विविध माहितीपटाच्या माध्यमातून येथे उलगडण्यात आला आहे. शेकडो पुस्तकांचे ग्रंथालयही यात आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकातील ज्ञान केंद्राचे लोकार्पण**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनप्रवास, त्यांचे साहित्य, त्यांची आंदोलने आणि विचार होलोग्राफी सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अनुभवण्याची संधी आता कल्याणकरांना मिळणार आहे. कल्याण डोंबिवली महापालिकेच्या ड प्रभाग कार्यालयाशेजारी उभारण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकातील ज्ञान केंद्राचे लोकार्पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला 13 एप्रिल रोजी राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत आणि सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांच्या हस्ते झाले. यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे अपरिहार्य कारणामुळे दृकश्राव्य माध्यमातून उपस्थित होते.



यावेळी दृकश्राव्य माध्यमातून संवाद साधताना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी या स्मारकाचा प्रवास उलगडून सांगितला. स्थानिकांची मागणी होती त्यानुसार हे स्मारक उभे राहिले. यात संघर्ष समितीपासून अनेकांचे योगदान आहे, असे यावेळी डॉ. श्रीकांत शिंदे म्हणाले. परस्पर संवादी (इंटरॅक्टिव) पद्धतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जीवनगाथा कळावी हे ज्ञान केंद्र उभारण्या मागचा मुख्य हेतू होता. या केंद्रात एक ते दीड तासात आगळावेगळा अनुभव मिळेल. या स्मारकासाठी प्रयत्न करणाऱ्या आणि पाठबळ देणाऱ्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचेही डॉ. शिंदे यांनी आभार मानले.

नागरिकांच्या मागणीनुसार आणि वेगळ्या संकल्पना अंमलात आणण्यासाठी इच्छाशक्ती लागते, ती इच्छाशक्ती खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्याकडे आहे, असे गौरवोद्गार सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांनी यावेळी काढले. या दिमाखदार सोहळयात शेकडोच्या संख्येने भीम बांधव उपस्थित होते. तसेच याप्रसंगी कल्याण पुर्वेच्या आमदार सुलभा गायकवाड, कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे आण्णा रोकडे, कल्याण डोंबिवली महापालिकेचे आयुक्त अभिनल गोयल, शिवसेनेचे कल्याण जिल्हाध्यक्ष गोपाळ लांडगे, आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खारघर हिरानंदानी पुलावर धोकादायक खड्ड्यांचा त्रास

**पनवेल, दि. १५ प्रतिनिधी**

सायन-पनवेल महामार्गावरील खारघर येथील हिरानंदानी पुलाची दुरवस्था झालेली असून पुलाच्या सळया उघड्या पडल्या आहेत. रस्त्यावर पडलेल्या खोल चिरेमुळे वाहनांचा वेग कमी करावा लागत आहे. वेग कमी होताच मागून येणाऱ्या वाहनाच्या धडकेमुळे किरकोळ अपघाताच्या घटनांत वाढ होत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी वाहनचालकांकडून केली जात आहे.

सायन-पनवेल महामार्गावर नेहमीच वाहनांची वर्दळ असते. दरम्यान, काही महिन्यांपूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून हिरानंदानी पुलावर डांबरीकरणाचे काम करण्यात आले होते; मात्र डांबरीकरणाचे काम करताना पुलाच्या मध्यभागी बीमलगत योग्यप्रकारे डांबरीकरणाचे काम झालेले नाही. त्यामुळे लोखंडी पट्ट्या उघड्या पडल्याचे दिसून येते. तसेच, जड वाहतुकीमुळे पुलास मोठे हादरे बसतात. रस्त्यावर पडलेल्या खोल खड्ड्यामुळे वाहनाचा वेग कमी होताच पाठीमागून येणाऱ्या वाहनाच्या धडकेमुळे किरकोळ अपघाताच्या घटनांत वाढ होत आहे. पुलावरील खड्ड्यांमुळे लहान वाहने व दुचाकींचे मोठे नुकसान होत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्यावरील खड्डेदुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# महामार्गावर लूटमारी करणारी चौकडी अटकेत

**पनवेल, दि. १५ प्रतिनिधी**

महाड येथून कामोठे येथे नातेवाईकाकडे आलेल्या व्यक्तीला मारहाण करून लुटणाऱ्या चौकडीला कळंबोली पोलिसानी अटक केली. विशेष म्हणजे लूटमारीच्या घटनेची माहिती मिळाल्यानंतर कळंबोली पोलिसांनी खारघरमधील कोपरा गावापर्यंत या लुटारूंचा पाठलाग केला होता. मात्र, ते दुचाकीवरून पसार झाले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी रात्री हे लुटारू लूटमारी करण्यासाठी पुन्हा कळंबोली सर्कलजवळ निदर्शनास आल्यानंतर पोलिसांनी या चौघांची धरपकड केली. या चौघांना न्यायालयाने 17 एप्रिल पर्यंत पोलीस कोठडी सुनावली. या प्रकरणातील तक्रारदार स्वप्नील सकपाळ (33) हा महाड येथे राहण्यास असून तो कामोठे येथील नातेवाईकाकडे आला होता. त्यानंतर मध्यरात्री 1 वाजण्याच्या सुमारास तो रोडपाली सिग्नल येथून कळंबोली सर्कलच्या दिशेने पायी चालत जात होता. यावेळी स्वप्नील बिमा कॉम्प्लेक्सजवळ आला असताना केटीएम व पल्सर या दोन मोटारसायकलींवरून आलेल्या चौघा लुटारूंनी स्वप्नीलला अडवून त्याला बेदम मारहाण करून जखमी केले. त्यानतर चौघा लुटारूंनी त्याच्या खिशात असलेली रोख रक्कम जबरदस्तीने लुटून पलायन केले होते. त्यावेळी स्वप्नीलने पोलीस नियंत्रण कक्षाला सपर्क साधून याबाबतची माहिती दिल्यानंतर कळंबोली पोलिसांनी घटनास्थळी तत्काळ धाव घेतली. त्यानंतर पोलिसांनी या लुटारूंचा खारघरमधील कोपरा गावापर्यंत पाठलाग केला, मात्र हे लुटारू तेथून पळून जाण्यात यशस्वी झाले. या घटनेनंतर स्वप्नील सकपाळ घाबरल्याने तसेच त्याच्याकडून लुटलेली रक्कम ही किरकोळ स्वरूपाची असल्याने त्याने तक्रार दिली नव्हती. मात्र चौघे लुटारू पुन्हा कळंबोली सर्कल येथे त्याच मोटारसायकलवरून आले असता स्वप्नीलने त्यांना ओळखून त्यांची माहिती कळंबोली पोलिसांना दिली. त्यानंतर काही वेळातच कळंबोली पोलिसांनी त्याठिकाणी धाव घेऊन अशरफ अस्लम खान (22), करण दुर्गेश चव्हाण (22), सुजर दयानंद बिंद (22) व नवनाथ विठ्ठल वाघमारे (25) या चारही लुटारूंची धरपकड केली. या चारही लुटारूविरोधात जबरी लूट केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून चौघांना अटक करण्यात आल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यानी दिली.

# संभाजी भिडेला चावलेल्या कुत्र्याला शोधून दत्तक घेणार

**उल्हासनगर, दि. १५ प्रतिनिधी**

संभाजी भिडे याला चावलेल्या कुत्र्याचा शोध घेवून त्या कुत्र्याचा दत्तक म्हणुन सांभाळ करणार अशी घोषणा उल्हासनगर येथील स्वराज्य संघटनेचे अध्यक्ष ॲड . जय गायकवाड यांनी केली असून यांच्या या घोषणेने सर्वत्र चर्चेला उधाण आले आहे. ॲड, गायकवाड कुत्र्यांबाबत म्हणाले की कुत्रे हे माणसांना चांगले ओळखतात, त्यामुळे ज्यांच्यात माणूसपण मेलेले असते अशांना कुत्र्यांनी पाहिले तर भुंकतात अथवा चावतात. मी आज पर्यंत अनेक कुत्रे पाळले आणि माणूसपण आणि करुणा हा गुण माणसापेक्षा जास्त कुत्र्यांमध्ये असतो. हाच अनुभव मला आला आहे. कुत्रे एकतर वेडे झाल्यावर चावतात. नाहीतर समाजाला घातक असणाऱ्या लोकांना चावतात आणि संभाजी भिडे हा या पिढीसाठी घातक आहे. या बाबत दुमत नाही. त्यामुळे संभाजी भिडे याला चावलेल्या कुत्र्याचा शोध घ्या आणि मला 9503969098 या क्रमांकावर संपर्क करा, असे आवाहन ॲड. गायकवाड यांनी केले आहे. एकतर तो कुत्रा एक हुशार प्राणी आहे, ज्याने अमानवी मनुष्याला ओळखले आणि धडा शिकवला म्हणून त्याला दत्तक घेऊन त्याचा संपूर्ण सांभाळ करणार असल्याची घोषणा स्वराज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. जय गायकवाड यांनी केली आहे.

# तळोजा वसाहतीमधील उघड्या वीजपेट्या बनल्या धोकादायक

**पनवेल, दि. १५ प्रतिनिधी**

शाळेला सुट्टी पडल्यामुळे सकाळ-संध्याकाळ विविध खेळ खेळण्यासाठी मुले मैदानाकडे धाव घेत आहेत; मात्र तळोजा सेक्टर-10 मधील मैदानातील खेळणी मोडकळीस आली आहेत. मैदानाभोवती लावण्यात आलेली लोखंडी जाळी गायब झाली असून, मैदानाला लागून असलेल्या वीजपेटी, ट्रान्स्फॉर्मर उघड्या अवस्थेत असल्यामुळे मुलांना धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे पालिकेने मैदानातील खेळणी दुरुस्त करून मैदानाभोवती जाळीची सोय करावी, अशी मागणी रहिवाशांकडून केली जात आहे.

सिडकोने तळोजा सेक्टर-10 येथील भूखंडावर खेळाचे मैदान विकसित केले आहे. परिसरात हे एकमेव मोठे मैदान आहे. सध्या शाळेला सुट्टी पडल्यामुळे विविध खेळ खेळण्यासाठी परिसरातील मुलांची मैदानात गदर्दी असते; मात्र मैदानातील सर्व खेळणी मोडकळीस आली आहेत. मैदानात कचरा साचला आहे. मैदानात सिडकोने उभारलेले सर्व पथदिवे अनेक दिवसांपासून बंद असल्यामुळे काही तरुण रात्रीच्या वेळी अमली पदार्थांचे सेवन करीत असल्याचे परिसरातील नागरिकांकडून सांगितले जात आहे. या मैदानाभोवती लावण्यात आलेली लोखंडी जाळी गायब झाली आहे. मैदानाला लागून असलेल्या वीजपेटी, ट्रान्स्फॉर्मर उघड्या अवस्थेत असल्यामुळे मुलांना धोका निर्माण होऊ शकतो. मैदानासाठी सिडकोने लोखंडी गेट उभारले होते, ते सध्या धोकादायक ट्रान्स्फॉर्मर मैदानाला लागूनच वीजपुरवठा करणाऱ्यासाठी ट्रान्स्फार्मर बसविण्यात आले आहेत. ट्रान्स्फार्मरच्या बाजूला असणाऱ्या वीजपेट्या उघड्या अवस्थेत आहेत. मैदानात मुले क्रिकेट खेळत असतात. खेळताना चेंडू उघड्या वीजपेटीत जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे काही अनुचित प्रकार घडल्यास त्यास कोण जबाबदार, असा प्रश्न नागरिकांकडून विचारला जात आहे.

# बंधाऱ्याच्या पाण्यात पडून एकाचा मृत्यू

**तलासरी, दि. १५ प्रतिनिधी**

आंघोळीसाठी बंधाऱ्याच्या पाण्यात उतरलेल्या एका इसमाचा नाकातोंडात पाणी जाऊन मृत्यू झाल्याची घटना तलासरी पोलीस स्टेशन हद्दीत घडली असून याबाबत तलासरी पोलीस स्टेशनाला आकास्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. काल संध्याकाळी साडेचारच्या दरम्यान दापचरी येथील महादेव मंदिरा समोर असलेल्या नदीवरील बंधाऱ्याच्या पाण्यात अंघोळ करण्या साठी उतरलेल्या भूपेंद्र चिमणलाल प्रजापती वय ५७ वर्ष रा.मदनवाड मिस्त्री चाळ तालुका बलसाड जिल्हा बलसाड राज्य गुजरात, यांचा बंधाऱ्यातील पाणी नाका तोंडात जाऊन मृत्यू झाला, याप्रकरणी तलासरी पोलीसानी अकस्मात मृत्यू म्हणून नोंद केली आहे.

# वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**भिवंडी, दि. १५ प्रतिनिधी**

अज्ञात वाहन चालकाने दुचाकीस्वारास धडक दिली असता झालेल्या अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच तडफडून मृत्यू झाल्याची घटना दापोडा रस्त्यावर घडली आहे.भद्रेश नरसय्या कनकुटला (५३) असे अपघातात मयत पावलेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे.याप्रकरणी अज्ञात वाहन चालकाच्या विरोधात नारपोली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,१२ एप्रिल रोजी सकाळी साडे सहा वाजेच्या सुमारास मयत भद्रेश हा दापोडा रस्त्याने दुचाकीने जात असताना अज्ञात वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन रहदारीच्या नियमाकडे दुर्लक्ष करुन निष्काळजीपणाने, हयगयीने चालवून भद्रेशच्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात भद्रेशचा अतिरिक्त स्त्रावाने जागीच मृत्यू झाला आहे.या अपघाताची माहिती मिळताच नारपोली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह शवविच्छेदनासाठी येथील शासकीय स्व.इंदिरा गांधी रुग्णालयात पाठवला असून या अपघात प्रकरणी मयत भद्रेशचा साडू श्रीनिवास प्रकाश कस्तुरी याच्या फिर्यादीवरून नारपोली पोलिस ठाण्यात भान्यासं कलम १०६,२८१ मो.वा.का.क १८४ १३४(अ) (ब) प्रमाणे गुन्हा दाखल केला असून पोलिस अज्ञात वाहन चालकाचा शोध घेत आहेत.

# ट्रकचालकाचा मृत्यू

**वसई, दि. १५ प्रतिनिधी**

ट्रकचालकाचा अपघातात मृत्यू महामार्गावरील भालीवली गावाच्या हद्दीत अपघातात एकाचा मृत्यू झाला आहे. रात्री गुजरातकडे जाणाऱ्या मार्गावर एक ट्रक (एमएच ४६ बीयू २६९१) हा नादुरूस्त झाला होता. चालक नसीर खान (४५) याने ट्रक रस्त्याच्या कडेला उभा केला. मात्र तो उभा करताना सुरक्षेची कुठलीही काळजी घेतली नव्हती. रात्री साडेनऊच्या सुमारास मागून येणाऱ्या एका ट्रेलरने (एचआर ७३ ए ०३८८) जोरदार धडक दिली.

या अपघातात ट्रकचालक नासीर खान याचा मृत्यू झाला. तर ट्रेलर चालक शमीम मोहम्मद हा जखमी झाला आहे.

# बाबा यशवंत वारंगे यांचे दु:खद निधन

**रोहा, दि. १५ प्रतिनिधी**

रोठ बुद्रुक गावातील यशवंत पुंडलिक वारंगे यांचे शिक्षण कमी परंतु अंगी असलेल्या प्रामाणिकपणा , कष्ट व मेहनत अशा अनेक कलागुणांनी बहरलेले असल्याने असंख्य लोकांचे जिवनाचा आणि जगण्याची दिशा देण्याचे यशांचे काम यशवंत यांनी केलेले होते . श्री धावीर महाराज यांच्या सलामीला न चुकता खालु बाजाची सेवा देणारे यशवंत पुंडलिक वारंगे यांचे वृद्धापकाळाने वयाच्या ९२ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला त्यामुळे संपुर्ण धाटाव पंचक्रोशीतील सुप्रसिद्ध असलेले बैलगाडी वाले व खालु बाजा सेवा देणारे बाबा गेल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात आली.

# महापालिकेचा विशेष उपक्रम; मुख्यालयात संविधान उद्देशिकेचे अनावरण

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनाच्या सौंदर्यीकरण कामांचे भूमिपूजन

**पनवेल, दि. १५ प्रतिनिधी**



पनवेल महानगरपालिका मुख्यालयात संगमरवरी दगडावर कोरलेल्या संविधान उद्देशिकेचे अनावरण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आज दिनांक १४ एप्रिल रोजी आमदार प्रशांत ठाकूर, आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त भारत राठोड,माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार ,सहाय्यक संचालक (नगररचना) केशव शिंदे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपयुक्त सर्वश्री डॉ. वैभव विधाते, प्रसेनजित कारलेकर, मंगला माळवे, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

संविधानाची उद्देशिका ही भारतीय संविधानाच्या सुरुवातीला दिलेली एक महत्त्वाची भूमिका आहे. या उद्देशिकेमध्ये भारताच्या संविधानाची मूलभूत तत्त्वे, मूल्ये आणि ध्येय स्पष्टपणे नमूद केलेली आहेत. उद्देशिका ही आपल्या संविधानाचा आत्मा असून ती आपल्याला संविधानाचे मूलभूत मार्गदर्शक तत्त्व समजून घेण्यासाठी मदत करते.

तसेच यावेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती-३ अंतर्गत प्रभाग क्र. १९ मधील भू.क्र. ३१८ येथे भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन उभारण्यात आले आहे. या भवनाच्या बाह्य व अंतर्गत सौंदर्यीकरणासह इतर अनुषंगिक कामांच्या भूमिपूजन सोहळ्याचे आयोजन आज रोजी आमदार प्रशांत ठाकूर, आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

या आंबेडकर भवनात महापालिकेतर्फे ग्रंथालय चालवले जाते. या ग्रंथालयात स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी अहोरात्र अभ्यास करत असतात. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी वातानुकूलित यंत्रणेसह इतर सुविधा या कामांतर्गत करण्यात येणार आहेत.

सदर आंबेडकर भवन सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी उपयुक्त ठरेल, तसेच स्थानिक नागरिकांसाठी एक महत्त्वाचा केंद्रबिंदू ठरेल, असा विश्वास आमदार प्रशांत ठाकूर यांनी यावेळी व्यक्त केला.

# डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने प्रहारचे आत्मचिंतन आंदोलन

**उल्हासनगर, दि. १५ प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त दिव्यांगाच्या समस्या सोडवन्यासाठी प्रहार संघटनेच्या वतीने महानगरपालिका आवारात आत्मचिंतन आंदोलन करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती असूनही महापालिकेकडून दिव्यांगजणांना दिले जाणारे मानधन वेळेवर न मिळाल्याने असंख्य दिव्यांगांच्या घरातील चूल पेटू शकली नाही. दरम्यान दिव्यांग कायदा २०१६ अंतर्गत दिव्यांगांना उपजीविकेसाठी स्टॉल देणे बंधनकारक असूनही महापालिकेची ही बेजबाबदार भूमिका अत्यंत खेदजनक असल्याचा आरोप प्रहार जनशक्ती संघटनेचे ठाणे जिल्हा अध्यक्ष ॲड . स्वप्निल पाटील यांनी केला आहे.

या दिव्यांगाच्या प्रश्नांवर आवाज उठवत आज दिव्यांग प्रतिनिधींनी प.पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून आत्मचिंतन आंदोलनास सुरुवात केली. या आंदोलनाची तात्काळ दखल घेत मा. आयुक्त महोदयांनी दिव्यांग प्रतिनिधींशी चर्चा केली. त्यांनी पुढील ४८ तासांत सर्व दिव्यांगांचे मानधन त्यांच्या खात्यात वर्ग करण्यात येईल, तसेच मानधन वितरण प्रक्रियेत झालेल्या विलंबाची चौकशी करून संबंधित दोषींवर कारवाई करण्यात येईल, असे तोंडी आश्वासन दिलेआहे .

तसेच, दिव्यांगांसाठी मोफत बससेवा, स्टॉल वाटप व दिव्यांग साहित्य खरेदीतील भ्रष्टाचारासंबंधी चर्चा करण्यासाठी बुधवार, दिनांक १६ एप्रिल २०२५ रोजी दुपारी ४ वाजता विशेष बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत ठोस निर्णय घेण्यात येणार असून त्याबाबतचे लेखी पत्र प्रहार जनशक्ती पक्षाला देण्यात आले आहे. मा. आयुक्तांच्या आश्वासनानंतर आंदोलन सध्या स्थगित करण्यात आले असून पुढील निर्णय १६ एप्रिल रोजी होणाऱ्या बैठकीनंतर घेण्यात येणार ॲड . स्वप्निल पाटील यांनी सांगितले .या आंदोलनात प्रहार जनशक्ती पक्ष व राष्ट्र कल्याण पार्टी चे कार्यकर्ते तसेच मोठ्या प्रमाणात दिव्यांग बांधव सहभागी झाले होते.

## महत्त्वाचे

### भाजीबाजारामुळे होतेय वाहतुकीची कोंडी

**नाशिक ।** शहरातील नागरी वसाहत असलेल्या सिडकोमध्ये दत्त मंदिर ते पवन नगर परिसरात दररोज वाहतुकीची प्रचंड कोंडी होत असून या ठिकाणी अतिक्रमण वाढले आहे. दत्त मंदिरपासून तर त्रिमूर्ती चौकापर्यंत तर रात्री इतक्या मोठ्या प्रमाणात गर्दी असते की येथून पायी चालणेही अवघड होऊन जाते. रस्त्यावरच बसलेले भाजी विक्रेते, फळे विक्रेते आणि त्याच्या पुढे लावण्यात आलेल्या दुचाकी, चारचाकी वाहने यामुळे रस्ते अधिकच अरुंद होतात. पर्यायाने मोठी वाहने, बसेस, चारचाकी आणि दुचाकी यांना ये-जा करण्यास रस्ताही राहत नसल्याने त्या ठिकाणी प्रचंड वाहतुकीची कोंडी होऊन प्रसंगी वादाच्या घटना घडतात. संध्याकाळी चार वाजेपासून तर रात्री १० वाजेपर्यंत हीच परिस्थिती कायम असते. विशेष म्हणजे या ठिकाणी कोणीच कोणाचे ऐकत नाही. बाजाराला येणारे नागरिक कुठेही, कशाही पध्दतीने जागा दिसेल तिथे वाहने लावून बाजारासाठी निघून जातात. त्यातच सिटी लिंकची शहर वाहतूक बस असल्यावर तर खूपच कोंडी होते. येथे परिसरातच स्टॉप असल्याने बस थांबते. त्यावेळेला खूप गर्दी होते.

### मागील भांडणाची कुरापत काढत हिरावाडीत दुकानाची तोडफोड

**नाशिक ।** हिरावाडीतील पंचांग चौकातील दिव्यांशू एंटरप्राइजेस या किराणा दुकानाची संशयितांनी तोडफोड करून नुकसान केल्याची घटना रविवारी (ता. १३) सायंकाळी घडली. या घटनेत संशयितांनी किराणा दुकानातील अनेक वस्तूंचे नुकसान केले आहे.शनिवारी (ता. १२) रात्री दोन गटांत अज्ञात कारणावरून झालेल्या वादातून रविवारी त्या वादाची कुरापत काढत दुकान फोडल्याची घटना घडली. सदर घटनेनंतर तत्काळ पंचवटी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत दुकान तोडफोड करणाऱ्या संशयितांचा शोध सुरू होता.

दरम्यान शनिवारीदेखील हिरावाडीत एका दुकानात रात्री परिसरातील एका युवकाचे व संबंधित दुकानदाराचे काहीतरी किरकोळ कारणावरून वाद झाले होते. त्यानंतर सदर वाद काही स्थानिक युवकांनी मिटविला होता. मात्र रात्री अकराला रिक्षात आलेल्या टाकळी परिसरातील चार ते पाच जणांच्या टोळक्याने हातात धारदार शस्त्र मिरवत ये- जा करणाऱ्या दुचाकी व पादचारी नागरिकांच्या अंगावर उगारत दमदाटी, शिवीगाळ केली. त्यानंतर एका युवकाला बेदम मारहाण केली होती. हिरावाडीत घटनेनंतर परिसरात जमलेल्या जमावाने हातात धारदार शस्त्र मिरविणाऱ्या त्या टोळक्याच्या रिक्षाच्या काचा फोडल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र घटनास्थळी पोलिस दाखल झाल्याने त्यांनी जमावाला पांगविण्यात आले होते. दरम्यान, शनिवारी झालेल्या वादातून रविवारी दिव्यांशू एंटरप्राइजेस दुकान तोडफोड केल्याची चर्चा आहे.

### विवाहाची मागणी घालत तरूणीचा विनयभंग : गुन्हा दाखल

**नाशिक ।** जाधव, ललित संगमनेरे व बाळासाहेब जाधव (रा.सर्व खेरवाडी ता.निफाड) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयितांची नावे असून त्यातील अमोल जाधव व बाळासाहेब जाधव हे काका पुतणे आहेत. नवीन जकातनाका भागात राहणा-या युवतीने याबाबत फिर्याद दिली आहे. अमोल जाधव हा संशयित पीडित युवतीचा आतेभाऊ असून ऑक्टोबर २०२३ पासून तो पीडितेला त्रास देत आहे. शारिरीक संबधासह लग्नाच्या मागणीसाठी वेळवेळी मोबाईलवर संपर्क साधत तसेच मित्रासमेवत पाठलाग करून शिवीगाळ करीत विनयभंग केला व माझ्याशी लग्न नाही केले तर उचलून नेण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमुद करण्यात आले आहे. दरम्यानच्या काळात संशयिताने मुलीचे ठरलेले लग्न बदनामी करून मोडले असून काका बाळासाहेब जाधव याना सोबत घेत त्याने वडिल व चुलत्याशी वाद घालत शिवीगाळ करून मुलीचे लग्न कसे होते तेच बघतो अशी धमकी दिली आहे. अधिक तपास उपनिरीक्षक मयुर निकम करीत आहेत.

### नाशिक-दिल्ली विमान प्रवास १५ एप्रिलपासून!

**नाशिक ।** सध्या इंडिगो एअरलाईन्सद्वारे ही सेवा सुरू असून, १५ एप्रिल पासून दिल्ली आंतरराष्ट्रीय विमानतळावर टर्मिनल २ च्या देखभाल दुरूस्तीसाठी आता इंडिगोची सर्व उडडाणे टर्मिनल-२ वरून टर्मिलन-१ वर हलविण्यात आली असल्याचे इंडिगोने जाहीर केले आहे. या पार्श्वभूमीवर, दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर टर्मिनल बदल करण्यात आला असून, १५ एप्रिलपासून इंडिगोची सर्व उड्डाणे टर्मिनल-२ वरून टर्मिनल-१ वर हलविण्यात येणार असल्याचे निवेदन जारी करण्यात आले आहे. दिल्ली विमानतळ प्रशासनाने यासंदर्भात स्पष्ट केले आहे की, टर्मिनल-२ वर मोठ्या प्रमाणावर देखभाल आणि सुधारणा कामे सुरू होणार असल्याने हा बदल आवश्यक आहे. परिणामी, टर्मिनल-२ येत्या दोन आठवड्यांसाठी बंद राहणार आहे. नाशिकहून दिल्लीसाठी दररोज सकाळी ९:०० वाजता इंडिगोची थेट विमानसेवा उपलब्ध आहे. यामुळे नाशिकहून दिल्लीला प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी आपली तिकिटे तपासून नवीन टर्मिनलमधून उड्डाणाची नोंद घ्यावी, असे आवाहन इंडिगो एअरलाईन्सने केले आहे.

# शहर-जिल्ह्यात महामानवाला अभिवादन

## मिरवणुका, जल्लोष, अभिवादन सभा, सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल

**नाशिक ।** डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त सोमवारी (दि. १४) शहर-जिल्ह्यात जणू निळं वादळ घोंघावलं. जयंतीच्या पूर्वसंध्येपासून सुरू झालेला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्मोत्सव रात्री उशिरापर्यंत जल्लोषात सुरूच होता.

रविवारी रात्री १२ वाजता शिवाजी रोडवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला हजारोंच्या संख्येने भीमसैनिकांनी अभिवादन करत जयघोष केला. यावेळी लोकप्रतिनिधी, आमदार, खासदार, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते. नाशिकरोड येथेही मध्यरात्री भीमसगर उसळला होता. येथेही हजारो भीमसैनिकांनी महामानवाचा जयजयकार करीत कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले. सिडको परिसरातील पाथर्डी फाटा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला भीमसैनिकांनी अभिवादन करीत भीमनामाचा गजर केला. शहर-जिल्ह्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यांची आकर्षक सजावट, रंगरंगोटी करून विद्युत रोषणाई करण्यात आली होती. शहरातील सर्वच



उपनगरे, नागरी वसाहती, मुख्य ठिकाणे, चौक, सर्कल आणि सार्वजनिक ठिकाणी जयंती उत्सव साजरा करण्यात आला. अनेकांनी मनोगत व्यक्त करीत महामानवाच्या कार्याचा उदोउदो केला. ठिकठिकाणी व्यासपीठ, रंगमंच, स्वागत कमानी उभारण्यात येऊन त्यावर निळे झेंडे, बॅनर, निळ्या पताका लावण्यात आल्या होत्या. शहरातील रस्त्यांच्या दुतर्फा मोठया प्रमाणात निळे झेंडे, पताका, बॅनर, कमानी लावण्यात आल्याने अवघे शहर निळे झाले होते. जयंतीच्या निमित्ताने जुने नाशिकमधून मुख्य मिरवणूक तर नाशिक रोड आणि पाथर्डी फाटा परिसरातही जल्लोषात मिरवणूक काढण्यात आली. जुन्या नाशिकमधून चौक मंडई येथील वाकडी बारवपासून मुंहै6 मिरवणूक सुरू झाली. याशिवाय सिडको, सातपूर, गंगापूर रोड, मखमलाबाद, पंचवटीसह उपनगरे आणि नागरी वसाहतींमध्ये छोट्या-मोठ्या मिरवणुका काढण्यात आल्या. शहरातील मुख्य मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर वाहतूक कोंडीची शक्यता लक्षात घेऊन या मार्गावरील वाहतूक इतरत्र वळविण्यात आली होती. मिरवणूक तथा शहरातील विविध ठिकाणी साजऱ्या करण्यात आलेल्या कार्यक्रमांना आ. छगन भुजब, आ. पंकज भुजबळ, माजी खासदार समीर भुजबळ, खा. राजाभाऊ वाजे, खा. शोभा बच्छाव, खा. भास्कर भगरे, आ. सीमा हिरे, आ. राहुल ढिकले, आ. देवयानी फरांदे, आ. सरोज आहेर, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. जिल्ह्यातील आमदार, माजी लोकप्रतिनिधी त्या त्या तालुके-गावांच्या ठिकाणी उपस्थित राहून त्यांनी महामानवाला अभिवादन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या पार्श्वभूमीवर काही अनुचित प्रकार घडू नये, गालबोट लागू नये म्हणून पोलिस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता. ठिकठिकाणी निघालेल्या मिरवणुकीमध्ये युवा वर्ग आणि तरूणाईचा उत्साह दांडगा दिसून आला. आबालवृद्ध मंडळी मिरवणूक आणि इतर सर्व कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतला. महिलांचाही सहभाग लक्षणीय असाच होता. पांढरा पोशाख, डोक्याला निळा फेटा, निळ्या टोप्या, कपाळाला बांधलेल्या निळ्या पट्ट्या, हातात निळे झेंडे, निळीची होणारी उधळण, ढोलताशांचा गजर, डिजेचा दणदणाट, भीमगीतांची सुरू असलेली अखंड आळवणी, नेत्रदीपक रोषणाई अशा भारावलेल्या निळ्या वातावरणात मिरवणूक संपन्न झाली.

### डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त संविधान कराओके क्लबचा विशेष गायन कार्यक्रम संपन्न



**नाशिक ।** डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त इंडिया सिक्युरिटी प्रेसच्या जिमखाना हॉलमध्ये संविधान कराओके क्लबच्या वतीने एक भव्य गायन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या विशेष कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना समर्पित आणि सामाजिक संदेश देणाऱ्या गीतांचे सादरीकरण करण्यात आले.

संविधान कराओके क्लबचे संस्थापक अध्यक्ष राजन गायकवाड व श्रीमती मीनाताई गांगुर्डे यांनी आपल्या भाषणातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार मांडले. या कार्यक्रमात राजन गायकवाड, रुपाली तायडे, गौतम भदाणे, फकीरचंद सिरसाठ, सविता सहानी, गोविंद भोळे, स्नेहल भालेराव, अनुपम क्षीरसागर, संजय देशपांडे, मीना पाठक, जयवंत गांगुर्डे, नितीन केदारे आणि अशोक महाजन यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित गाजलेली गाणी सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रुपाली तायडे, कु. स्नेहल भालेराव व गोविंद भोळे यांनी केले. कार्यक्रमा साठी सीएनपीचे निवृत्त अधिकारी मनोज चिमणकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

### जनसेवा फाउंडेशन इंदिरानगर आयोजित भारतरत्न डॉ. आंबेडकर जयंती उत्सव



**इंदिरानगर ।** येथील जनसेवा फाउंडेशन इंदिरानगर आयोजित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव यशस्वीरित्या पार पडले, अध्यक्ष- विवेक देशमुख, उपाध्यक्ष रमीज पठाण, खजिनदार- केशव पोतदार, सहखजिनदार- मोइन पठाण, सदस्य- नकुल काळे, अनुज उदावंत, चिन्मय कुलकर्णी, विवेक शिंदे, कार्तिक जाधव, शुभम गायकवाड़, हर्षद सानप, यश पगारे, पराग भावसार, रोहन बडगुजर, रोशन गौर, उर्वेश कोठारी आदी उपस्थित होते.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन...!









## रावळगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात संपन्न

**रावळगांव ।** डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती पंचशिल नगर रावळगाव येथे नाचून नाहीतर पुस्तके वाचून साजरी करण्यात आली. डॉ.स्वप्निल गरुड यांच्या संकल्पनेतून महापुरुषांचे विचार घराघरात पोहोचले पाहिजे या उद्देशानेच सर्व विद्यार्थ्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्र , बुध्द आणि त्यांचा धम्म, शेतकऱ्यांचा आसूड, शिवाजी कोण होता, भारतीय राज्यघटना , लहूजी वस्ताद, बिरसा मुंडा, अशा अनेक पुस्तकांच वाटप करुन त्यांना वाचन करायला सांगितले आणि वाचून झाल्या नंतर प्रश्न मंजूषा घेण्यात आली. अजूक उत्तरे देणाऱ्या विद्यार्थ्यांना पुस्तके बक्षीस देण्यात आली.तसेच बुध्द वंदना घेण्यात आली. तत्पूर्वी डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्य घटनेचे पुष्पपुजन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियांचे नाशिक जिल्हाध्यक्ष प्रशांत दादा गरुड यांच्या हस्ते करण्यात आले.विद्यार्थ्यांनी आजच्या ऑनलाईनच्या जमान्यात व्हाटस ॲप , फेसबुक ईंस्टाग्राम वरील खोटा इतिहास वाचण्यापेक्षा



पुस्तके वाचून खरा इतिहास जाणून घेतला पाहिजे तरच आजची तरुण पिढी विचारांनी अधिक समृध्द होईल असे प्रतिपादन त्यांनी याप्रसंगी केले.कार्यक्रम यशस्वीते साठी गोकुळ पवार, सुरज धिवरे हंसराज जाधव, बंटी अहिरे, धर्मराज केदारे, प्रसाद उशिरे, देवांग खरे, विनोद गवळी यांनी परिश्रम घेतले यावेळी श्री.दादाजी केदारे, श्री.निलेश केदारे, रघुनाथ वानखेडे, मिलिंद केदारे, विश्वनाथ केदारे, साहेबराव खरे, संजय धिवरे, हरी पवार, पिंटू पवार, यशवंत वानखेडे, दिपक अहिरे, अतुल गायकवाड इत्यादी कार्यकर्ते व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



निफाडला डॉ. आंबेडकर यांचा जयंती मिरवणूक कार्यक्रमा दरम्यान अचानक फटाक्यांचा आतिषबाजीमुळे डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळील देखाव्याला अचानक आग लागली होती. निफाडचे सिनियर पोलिस इन्स्पेक्टर गुरव साहेब व सहकाऱ्यांनी आग विझविण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले.

**ग्रुप ग्रामपंचायत, दातली, ता. सिन्नर, जि. नाशिक.**

**जाहीर निविदा सूचना**

सरपंच ग्रुप ग्रामपंचायत दातली, ता. सिन्नर, जि. नाशिक हे ग्रामनिधीतून खालीलप्रमाणे बी-१ निविदा जिल्हा परिषदेच्या नोंदणीकृत सु.बे. मक्तेदारांकडून मागवत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय किंमत | बयाणा रक्कम | निविदा फी |
|---|---|---|---|---|
| ०१ | दातली येथे महादेव मंदिर ते साईबाबा मंदिर पर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | २,६०,६८७/- | २६०६/- | ५००/- |

अटी व शर्ती- १) सदर निविदा दि.१६/०४/२०२५ ते २२/०४/२०२५ रोजी सुट्टीचे दिवस वगळून दुपारी ५ वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. २) मोहोरबंद निविदा दि.२३/०४/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता उघडण्यात येईल. ३) जीएसटी प्रमाणपत्र,पॅनकार्ड, नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक. ४) बांधकाम प्रलंबित नसल्याचा दाखला जोडणे आवश्यक. ५) कोणतेही कारण न देता निविदा स्वीकारण्याचा/ नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतने राखून ठेवला आहे.

**सही/- ग्रामसेवक अधिकारी** **सही/- सरपंच**

**ग्रुप ग्रामपंचायत दातली, ता. सिन्नर, जि. नाशिक.**






# निवडक सेंसरशिप का?



कल्पना पांडे
भाईंदर, जिल्हा ठाणे.
9082574315

द स्टोरीटेलर सारखा दर्जेदार, संवेदनशील व अर्थपूर्ण चित्रपट बनवणारे राष्ट्रीय पुरस्कार विजेते अनंत महादेवन दिग्दर्शित 'फुले' हा चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वीच जोरदार वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. 'फुले' हा चित्रपट मूळतः ११ एप्रिल २०२५ रोजी प्रदर्शित होणार होता, परंतु महाराष्ट्रातील काही ब्राह्मण संघटनांनी उपस्थित केलेल्या जातीयतेला प्रोत्साहन देण्याच्या आक्षेपांमुळे तो २५ एप्रिल २०२५ पर्यंत पुढे ढकलण्यात आला आहे.

---

शिक्षणाद्वारे भारतातील मुलींसाठी पहिली शाळा स्थापन करणे आणि तथाकथित मागास जातीचा उत्थान करणे हे फुले दाम्पत्याचे कार्य सामाजिक न्यायाच्या व्यवस्थेत केंद्रस्थानी आहे. चित्रपटात प्रतीक गांधी ज्योतिराव फुलेच्या भूमिकेत आणि पत्रलेखा सावित्रीबाई फुलेच्या भूमिकेत आहेत.

हा चित्रपट १९ व्या शतकातील भारतात शिक्षण आणि सामाजिक समानतेसाठी त्यांच्या अग्रगण्य प्रयत्नांचा आढावा घेतो, ज्यामध्ये १८४८ मध्ये मुलींसाठी देशातील पहिली शाळा स्थापन करणे समाविष्ट आहे. अनंत महादेवन यांनी दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटाचे उद्दिष्ट जात आणि लिंगभेदाविरुद्धच्या त्याच्या अथक संघर्षावर प्रकाश टाकणे आहे. ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित हा चित्रपट जात आणि लिंगभेदाविरुद्धच्या त्याच्या संघर्षाला मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करतो.

ब्राह्मण संघटनांच्या आक्षेपांना उत्तर म्हणून, सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशन (सीबीएफसी) ने चित्रपटात बदल करण्याची शिफारस केली. सीबीएफसीने चित्रपटातील 'मांग', 'महार', 'पेशवाई' यांसारख्या जातीय संदर्भ असलेल्या शब्दांना काढून टाकण्याची किंवा परिवर्तन करण्याची शिफारस केली आहे. त्याचप्रमाणे, '३,००० वर्षांच्या गुलामगिरी' या संवादाला 'अनेक वर्षांच्या गुलामगिरी' अशी सुधारित अभिव्यक्ती सुचवली गेली आहे.

खरं तर यामुळे फुले यांच्या चळवळीतील जातीय अत्याचारांच्या कठोर ऐतिहासिक वास्तवाला मवाळ केले जात आहे. ही काटछाट फुले यांच्या वैचारिक वारशाच्या प्रामाणिकतेवर आणि त्यांनी प्रतिनिधित्व केलेल्या वंचित गटांच्या ऐतिहासिक संघर्षावर अन्याय्य परिणाम करते. विविध सामाजिक संघटनांनी या निर्णयावर टीका केली असून, ते सीबीएफसीवर दुटप्पीपणाचा आरोप करत आहेत.

पहिली गोष्ट म्हणजे, आपल्या देशात चित्रपटांना मंजुरीचे निकष वेगवेगळे आहेत का? वादग्रस्त विधाने आणि माहिती असलेल्या द केरळ स्टोरी आणि द काश्मीर फाइल्स सारख्या चित्रपटांना सेन्सर बोर्डने सहज मंजुरी दिली. या सारख्या इतर चित्रपटांना अशा प्रकारच्या काटछाटीचा सामना करावा लागला नाही. परंतु सामाजिक सुधारणा आणि ब्राम्हणशाही मूल्यांवर अक्षरीत जातीवादविरोधी संघर्ष करणाऱ्या फुले या समाजसुधारक जोतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या कार्यावर चित्रपटात अनेक बदल करण्याचा सल्ला हेतुपूर्वक दिला जात आहे.

महात्मा फुले यांचा जन्म ११ एप्रिलचा. त्यांच्या जयंती निमित्त हा चित्रपट निघण्याचा संबंध त्याचा व्यावसायिक हिताशी देखील आहे. हा चित्रपट वेळेवर प्रदर्शित न झाल्याने त्याच्या यशावर परिणाम होणार म्हणूनच हे बदल सुचवले गेले आणि मंजुरीत विलंब झाला.

ही विसंगती दर्शवते की सीबीएफसी सर्व चित्रपटांवर एकसमान नियम लावत नाही. ज्या चित्रपटांचे कथानक काही विशिष्ट दृष्टिकोनाला पाठिंबा देतात, त्यांना सोपे जाते, तर जे आव्हानात्मक विषय हाताळतात, त्यांना अडथळे येतात. हा निवडकपणा सीबीएफसीच्या निष्पक्षतेवर प्रश्न निर्माण करतो. यातून कलात्मक स्वातंत्र्य आणि ऐतिहासिक सत्याला पुढे आणण्यावर बंधने येत आहेत.

दुसरी बाब ही आहे की, भारतात जात हा अत्यंत संवेदनशील मुद्दा आहे. जातीवर आधारित भेदभाव आजही कायम आहे. फुले सारखे चित्रपट जे या प्रश्नांना थेट भिडतात, त्यांना वेगवेगळ्या पद्धतीने अडवले गेले आहे.

सेंसार बोर्डात असलेल्या लोकांची नावे आणि त्यांची पार्श्वभूमी तपासली तर सीबीएफसीची ही कृती राजकीय दबाव किंवा सामाजिक स्थैर्याच्या नावाखाली घडत आहे, हे काही वेगळे सांगायची गरज नाही. फुले सारख्या चित्रपटाला कठोर नियम लावले जाणे हे दर्शवते की सीबीएफसी सामाजिक सुधारणांवर बोलणाऱ्या चित्रपटांवर नियंत्रण आणू इच्छिते, तर विभाजनकारक कथानकांना सूट देते.

तिसरी महत्वाची बाब म्हणजे फुले चित्रपटाला वेळेवर प्रदर्शित करण्यात परवानगी नकरण्यामागे ब्राह्मण संघटनांच्या तक्रारींचा मोठा हात आहे. या संघटनांचे मत आहे की जोतिराव आणि सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित या चित्रपटात ब्राह्मण समुदायाचे प्रतिकूल चित्रण केले गेले आहे, ज्यामुळे ब्राह्मणांना खलनायकासारखे दाखवले गेले किंवा त्यांच्यावर अन्यायकारक टीका झाली.

या तक्रारींमुळे सीबीएफसीने चित्रपटाच्या प्रदर्शनावर प्रश्नचिन्ह उपस्थित करून काही दृश्ये आणि संवादांवर आक्षेप घेतले आणि बदल सुचवले, ज्यामुळे चित्रपट प्रदर्शनाला विलंब झाला आहे.

परंतु दुसरीकडे, चित्रपटकर्त्यांचा दावा आहे की चित्रपट ऐतिहासिकदृष्ट्या अचूक असून, त्यात फुले दाम्पत्याच्या कार्याला पाठिंबा देणारी समर्थक ब्राह्मण पात्रेही आहेत, आणि त्यांचा कोणत्याही समुदायाला बदनाम करण्याचा हेतू नाही. तरीही, सीबीएफसीने ब्राह्मण संघटनांच्या तक्रारींना प्राधान्य दिले.

चित्रपटकर्त्यांच्या ऐतिहासिक अचूकतेच्या दाव्यांकडे दुर्लक्ष करून जातीशी संबंधित शब्द किंवा प्रसंग बदलण्याचा आग्रह धरला. यामुळे सीबीएफसी ची निष्पक्षता संशयास्पद ठरते, कारण ते एका विशिष्ट गटाच्या भावनांना जास्त महत्त्व देत असल्याचे दिसते आणि चित्रपटकर्त्यांच्या कलात्मक दृष्टिकोनाला दुर्लक्षित करत आहेत. परिणामी, असा प्रश्न निर्माण होतो की सीबीएफसी स्वतंत्रपणे निर्णय घेत आहे की संघटनांच्या दबावाखाली काम करत आहे?

जर सीबीएफसी दबावाखाली ऐतिहासिक सत्य किंवा कलात्मक दृष्टिकोन बदलण्यास भाग पाडत असेल, तर चित्रपटकर्त्यांचा मूळ संदेश कमकुवत होतो आणि प्रेक्षकांच्या माहितीच्या अधिकारावर परिणाम होतो. त्यामुळे सीबीएफसीच्या कार्यपद्धतीवर आणि विश्वासार्हतेवर प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आणि गरजेचेच आहे.

चौथा मुद्दा कलात्मक स्वातंत्र्याचा आहे. फुलेंच्या ध्येयाचा मूळ घटक शोषणावर आधारित सुधारणा असल्यामुळे, त्यात तेव्हा मोठा विरोध आणि कठोर सामाजिक संघर्ष होणारच. या संपादनांमुळे चित्रपटाची ऐतिहासिक अचूकता होईल. यामुळे चित्रपटकर्त्यांच्या कलात्मक दृष्टीकोनाला आणि प्रेक्षकांच्या अप्रतिबंधित माहिती हक्काला अन्याय होत आहे. होत असल्याचे मानले जाते.

हा ऐतिहासिक तथ्यांवर आधारीत सामाजिक भीषणतेच्या कलात्मक अभिव्यक्ती आणि वर्तमान राजकीय व्यवस्थेतील संघर्ष आहे.

चित्रपटाला स्वीकृती मिळाली तरी किंवा विरोध झाला तरी, एक गोष्ट निश्चित आहे, हा चित्रपट आपल्या सामाजिक इतिहासाचा आरसा असल्याप्रमाणे दाहक वास्तव समोर आणत आहे. यात शिक्षणासाठी संघर्ष करणारी स्त्री, जातीच्या भिंतींना तोडणारा शिक्षक, ब्रम्हण्यवादी वर्चस्ववादावर आधारित हिंदू धर्म धमार्ची जात व्यवस्था, सामाजिक बहिष्कार, धार्मिक दहशत; महात्मा फुले यांचा जीवनपट या सर्वांचा समावेश आहे.

महात्मा फुले यांचे कार्य त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांच्या योगदानाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. एका अशिक्षित लहान वयात विवाहबद्ध झालेल्या मुलीला त्यांनी शिक्षण दिलं आणि समाजात पहिली महिला शिक्षिका म्हणून उभं केलं. या स्त्रीने सामाजिक बहिष्कारासमोर उभं राहून शिक्षणाचा दीप सतत प्रज्वलित ठेवला.

फुल्यांनी जातीवादी वर्चस्ववादावर आधारित शिक्षणव्यवस्थेच्या भिंती उद्ध्वस्त केल्या. त्यांनी अस्पृश्य, दलित आणि शूद्र मुलांसाठी स्वतंत्र शाळा सुरू केल्या. त्यांच्या शाळांमध्ये जात विचारली जात नसे, हे त्या काळात क्रांतिकारक होते. फुले यांनी गुलामगिरीसारख्या ग्रंथात जातीय व्यवस्थेचा पदार्फाश केला आणि ब्राह्मणशाहीवर थेट प्रहार केला. ते म्हणाले, जोपर्यंत समाज शिक्षित होत नाही, तोपर्यंत तो गुलामच राहणार.

महात्मा फुले यांनी सुरू केलेली सामाजिक चळवळ सत्ताधारी वर्णव्यवस्थेखिल विरोध दर्शवणारी होती. यामुळे त्यांना समाजाकडून मोठ्या प्रमाणात विरोध सहन करावा लागला. त्यांचे कुटुंब त्यांच्याशी संबंध तोडले, आणि समाजाने त्यांना बहिष्कृत केले.

सावित्रीबाईंवर टाकलेले अपमान आणि घाण यामुळे ते खचले नाहीत. धार्मिक दहशतीचे स्वरूप देखील त्यांनी सहन केले. त्यांनी देव, धर्म आणि पूजा-पद्धती याबद्दल प्रश्न उपस्थित केले. देव माणसाचा निर्माता नसून माणूस देवाचा निमार्ता आहे, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. या विचारांमुळे त्यांना नास्तिक आणि धर्मद्रोही म्हणून हिणवले गेले, तरीही त्यांनी विचारांचा मार्ग सोडला नाही.

महात्मा फुले यांच्या कार्याची व्याप्ती केवळ शिक्षणापुरती नव्हती. त्यांनी सत्यशोधक समाज स्थापन करून सामाजिक समतेचा नवा मार्ग खुला केला. विधवांचे पुनर्विवाह, स्त्रियांच्या गर्भपाताच्या अधिकारांचा, मुलींच्या शिक्षणाची आवश्यकता, शेतीतील शोषण आणि ब्राह्मण-पुजक वर्गाचे वर्चस्व यासारख्या विविध सामाजिक प्रश्नांवर त्यांनी लेखन आणि कृती केली. त्यांनी कुठेही संघर्ष थांबवला नाही आणि सत्यशोधक समाजाची स्थापना केली, ज्याचा मुख्य उद्देश जातीअंतर्गत समानता स्थापन करणे आणि ब्राह्मणसत्ताक वर्चस्वाला विरोध करणे हा होता.

सत्यशोधक समाजाने विवाह, नामकरण, अंत्यसंस्कार यांसारख्या धार्मिक विधी ब्राह्मणांशिवाय पार पाडण्यास सुरुवात केली. जातीपात न मानता एकत्र जेवण आणि सार्वजनिक कार्यक्रम आयोजित करण्याची परंपरा सुरू केली. सर्व जातीतील लोकांनी एकत्र येऊन सत्यशोधक म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली. सत्यशोधक समाजामुळे पहिल्यांदा दलित, शूद्र, स्त्रिया यांना आपलंसं वाटणारं एक सामाजिक व्यासपीठ मिळालं. समाजात शिक्षणाची चळवळ पोचली.

महात्मा फुले यांचे वय वाढला, आरोग्य ढासळले, पण समाजासाठी कार्य करण्याची ऊर्जा क्षीण झाली नाही. त्यांच्या मृत्यूनंतरही सत्यशोधक चळवळ चालूच राहिली. नंतरच्या काळात शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पेरियार यांच्यासारख्या नेत्यांना सत्यशोधक विचारसरणीने प्रेरणा दिली. आजही जातीच्या नावावर माणसांची हत्या केली जाते, देव-धर्माच्या नावावर अंधश्रद्धा वाढते, आणि महिला, दलित, ओबीसी यांच्या हक्कांवर गदा येते.

दिग्दर्शक अनंत महादेवन यांनी चित्रपटाचा बचाव करण्यासाठी स्पष्टपणे सांगितले आहे की, माझ्या चित्रपटाला कोणताही अजेंडा नाही. भारतीय समाजाचा चेहरामोहरा बदलणाऱ्या समाजसुधारकांना ही एक खरी सिनेमाई श्रद्धांजली आहे.

त्यांच्या म्हणण्यानुसार, चित्रपटाचा हेतू चिथावणी देणे नसून शिक्षित करणे आणि प्रेरणा देणे असा आहे. फुलेवाद हा केवळ एका चित्रपटापुरता मर्यादित नाही; तो भारतातील जातीय चर्चेभोवती खोचलेली अस्वस्थता आहे. फुले यांचे कार्य शैक्षणिकदृष्ट्या साजरे केले जात असले तरी, प्रसारमाध्यमांद्वारे त्यांच्या सामाजिक बदलावे पाहणाऱ्या विचारांचे चित्रण करण्याच्या प्रयत्नांना अजूनही विरोध होत आहे.

जातीय विषमतेला आव्हान देऊन दलित-पीडित समुदायांना सक्षम करण्यासाठी फुले दाम्पत्याने अखंड संघर्ष केला. महात्मा फुले यांचा सुरू केलेला विचारांचा लढा आजही आपल्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. शिक्षण, समता आणि न्यायाच्या दिशेने चालणाऱ्या प्रत्येक पावलामागे महात्मा फुले यांचा प्रेरणादायी वारसा असतो. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी दाखवलेला सत्यशोधक मार्ग आजही अनेकांच्या विचारांना आधार देतो.

■ ■ ■

# सज्जन लोकांची निष्क्रियता कुणाच्या पथ्यावर पडते आहे?

पूर्वार्ध
मिलिंद गड्डमवार
सामाजिक कार्यकर्ते व मुक्त पत्रकार
राजुरा, जि. चंद्रपूर.
9511215200

हिंदू धर्मात काळाचे चार युग मानले जातात. सत्ययुग, त्रेतायुग, व्दापरयुग आणि कलियुग.आपणं कलियुगात जगत आहोत.सत्ययुगात मानवामध्ये सद्गुण आणि नैतिकता पुरेपुर होती. त्रेतायुगात मानवांमधील सद्गुण आणि नैतिकता थोडी कमी झाली. व्दापारयुगात यामध्ये आणखी घट झाली. तर कलियुगात मानवांमध्ये सर्वाधिक दुर्गुण भरले असून नैतिकता ही नावापुरतीच शिल्लक असलेली पहायला मिळते आहे. यात अतिशयोक्ती नाही. हे आपणांस अनेक अनुभवांवरून लक्षात येते आहे.

---

कौटुंबिक व्यवस्थेचा, सामाजिक रचनेचा मागोवा घेतला तर ही बाब लक्षात येते आहे.आज एकत्र कुटूंब पध्दती ही लोप पावत चाललेली आहे. विभक्त कुटूंब पध्दतीचा स्वीकार अनेकांनी केलेला आहे.यांस अनेक गोष्टी कारणीभूत ठरतात आहेत.जीवनशैली ही मोठ्याप्रमाणात बदललेली आहे. भारत हा नावापुरताच कृषीप्रधान देश राहिलेला आहे.

ग्रामीण लोकांचे मोठ्या प्रमाणावर शहरात विविध कारणाने स्थानांतरण होत आहे. खेडी ही ओस पडत चालली आहेत. तर शहरे ही फुगत ची चालली आहेत. मग ती शैक्षणिक आणि रोजगाराच्या कारणाने कां असेना ! यासाठी केंद्र व राज्य सरकारची धोरणे पणं कारणीभूत ठरतात आहेत.

देशातील फुकटछाप योजनांमुळे देशातील नागरिकांची काम करण्याची इच्छा व क्षमता यात कमी आलेली आहे. या कारणाने जनता ऐदी बनत चालली आहे.तिला कुठलेही काम न करता आपले जीवन सुखी व्हावे असे वाटत आहे.केंद्र व राज्य सरकारने जनतेचे पालकत्व स्विकारून मनमानेल तसा राज्यकारभार करावा असे जनतेला वाटते आहे. कारणं केंद्र व राज्य सरकारच्या चुकीच्या कारभाराचा कुणीही तिव्र विरोध करतांना आढळून येत नाहीत.

महागाईच्या मुद्यांवरून, शेतमालाचा भाव ठरविण्याच्या अधिकारा वरून, रोजगाराच्या मागणीवरून, न्यायदानाच्या भुमिकेवरून, सर्वांसाठी चांगल्या आरोग्य सुविधा आणि मोफत शिक्षणाच्या मागणी वरून कुणीही आज आंदोलन करू इच्छित नाहीत. जो तो आज आपल्याच मस्तीत जगतो आहे. फक्त स्वतःपुरताच विचार करतो आहे.

स्वतःच्या कुटुंबातील लोकांचे कल्याण आणि सुख कशात आहे याचा शोध घेतो आहे आणि त्यानुसार आपले आचरण करतो आहे. यामुळे कुपमंडूक प्रवृत्तीत दिवसेंदिवस वाढ झालेली पहायला मिळते आहे. राजकारणात, नोकरी- व्यवसायात याचे प्रतिबिंब दिसून येते आहे. ही फार चिंतेची बाब ठरते आहे.

साध्या भोळ्या,भाबड्या, निरूपद्रवी माणसांना समाजातील जगणे असह्य होत चालले आहे.त्यांचा विविध कारणाने कोंडमारा केला जातो आहे. त्यांचे कुठलेही साधे काम सरळ मार्गाने सरकारी नियमांनुसार केले जात नाही. त्यासाठी त्यांना विविध अडीअडचणींचा सामना करावा लागतो आहे. यामुळे त्यांचा बहुमुल्य वेळ आणि पैसा वाया जातो आहे.

आपल्या कामांसाठी मानसिक त्रासाला तोंड द्यावे लागते आहे.याची साधी दखल कुणीही घेत नाही. मग ते अधिकारी गण असो वा राज्यकर्ते! कुठलाही अन्याय झाला की कोर्टात जायला सांगतात. स्थानिक पातळीवर कुठलाही न्याय, निकाल उपलब्ध होत नाही.

स्वातंत्र्य मिळून जनतेला काय लाभ झाला? उलट यामुळे जनतेला तोंड दाबून बुक्यांचा मार सहन करावा लागतो आहे. तर नेते मंडळी पैशाने गब्बर होत आहेत. नाहीतर त्याच कामाचे जास्तीचे पैसे पेरून काम करवून घ्यावे लागत आहे. याची दाद मागण्यासाठी कोर्टाशिवाय दुसरा पर्याय शिल्लक राहिलेला नाही. यामुळे कोर्टातील केसेसच्या प्रमाणात वाढ झालेली पहायला मिळते आहे.

वेळेत न्याय देईल ते कोर्ट कसले? कुठलीही गरज नसतांना कोटार्ची पायरी चढण्यासाठी सामान्य माणसाला बाध्य केले जात आहे. कोर्ट केस लढता लढता माणसाला मरण आले तरी चालते. आपल्याकडे त्रिस्तरीय न्याय पध्दती सामान्यांसाठी उपलब्ध असल्या कारणाने कुठलाही न्याय किंवा निकाल जीवंतपणी मिळेलच याची खात्री बाळगता येत नाही.

श्रीमंत माणसांसाठी सुप्रीम कोर्टाचे दरवाजे रात्री-बेरात्री पणं बेलसाठी, जामीनासाठी उघडले जातात हे आपणं अनुभवलेले, पाहिलेले आहे. यामुळे सामान्य व गरीब जनतेची गुलामीकडे वाटचाल सुरू झाली आहे. घटनेतील कायद्याचे दाखले देऊन जनतेची फसवणूक केली जात आहे. कायद्यांचे पालन आपआपल्या सोयीनुसार केले जात आहे.कायद्याचा अर्थ सोयीनुसार काढला जातो आहे.

आजच्या परिस्थितीत दुर्जन शक्तीने सज्जन शक्तींवर विजय संपादन केला असल्याचे चित्र सर्वत्र पहायला मिळते आहे.आजच्या परिस्थितीत शेतकरी हा सुखी नाही. तो आर्थिक ओज्याखाली दबल्या गेल्याने आत्महत्या करतो आहे. जास्तीचे कष्टाचे काम आणि कमी आर्थिक मोबदला देऊन कामगारांची पिळवणूक केली जात आहे. त्यांची सुरक्षा धोक्यात आली आहे. आयुष्याचा शेवट हा गोड न होता तो असह्य वेदनेने आज विव्हळतो आहे. त्याला आर्थिक अस्थिरतेने ग्रासलेले आहे. त्याच्या आरोग्याची माती होत आहे.

कुटूंब व्यवस्था ही विस्कळीत झाली आहे. तिला स्थैर्य प्राप्त होत असल्याचे दिसून येत नाही आहे. वैवाहिक घटस्फोटाच्या प्रमाणात वाढ झालेली आढळून येत आहे. या सर्व घटनेसाठी सज्जन शक्तींची निष्क्रियता कारणीभूत ठरते आहे. आज सरकारच्या चुकीच्या धोरणांना विरोध होतांना दिसून येत नाही आहे.

सज्जनशक्ती दुर्जनांसमोर हतबल ठरते आहे.आपल्या डोळ्यांदेखत आपल्या मुलींवर,आप्तेष्टांवर अत्याचार, बलात्कार आणि त्यांचा अतोनात छळ करून त्यांना मारले जात आहे. त्यांचा वाली कुणीही राहिलेला नाही. बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीने हे वास्तव अधोरेखित केले आहे. राज्य सरकारे आपली सत्ता टिकवीण्यात मष्गुल आहेत. आज सगळीकडेच माफियांचे राज्य विस्तारलेले आहे. त्यांनी कायदा हाती घेतला आहे. कायद्याचा धाक संपुष्टात आलेला आहे. लोकप्रतिनिधी, अधिकारीगण त्यांच्या हातचे बाहुले बनले आहेत.

आज ते जनतेचे हिरो बनले आहेत. झुंडशाहीच्या जोरावर ते सत्ताधाऱ्यांना भारी पडत आहेत. सत्तेवरील त्यांची पकड मजबूत होत चालली आहे. त्यांच्या नाड्या आवळणे हे मतदारांच्याच हातात आहे.मतदान करतांना डोके गहाण ठेवून चालत नसते. हे आपल्या मतदारांना केंव्हा कळणार आहे?

सज्जन शक्तींनी एकत्र येऊन याचा मुकाबला करायला पाहिजे. अनेक गटांमध्ये विखुरली गेलेली सज्जन शक्ती संघटीत गुन्हेगारीचा मुकाबला कसा करणार आहे ? यासाठी सज्जन शक्तींना एकत्र यावेच लागेल. आज सज्जन लोकांचे कुठलेही काम पैसे दिल्याशिवाय होत नाही. तक्रार करण्यास गेले असता ते पुरावा सादर करण्यास सांगतात.

(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)

■ ■ ■

# आंतरराष्ट्रीय आवाज दिन

पूर्वार्ध
कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे
गडचिरोली.
९४२३७१४८८३.

जागतिक आवाज दिन दरवर्षी १६ एप्रिल रोजी साजरा केला जातो. सर्व लोकांच्या दैनंदिन जीवनात आवाजाचे प्रचंड महत्त्व प्रदर्शित करणे हा या दिवसाचा उद्देश आहे. १९९९ मध्ये ब्राझिलियन सोसायटी ऑफ लॅरींगोलॉजी अँड व्हॉईसने डॉ. नेडिओ स्टीफन यांच्या अध्यक्षतेखाली १६ एप्रिल हा दिवस पहिल्यांदा ब्राझिलियन व्हॉइस डे म्हणून साजरा केला.

---

आज १६ एप्रिल असून दरवर्षी आजच्या दिवशी जागतिक आवाज दिन-वर्ल्ड व्हाइस डे साजरा केला जातो. लोकांना त्यांच्या आवाजाचे महत्त्व समजावे यासाठी हा दिवस आयोजित केला जातो. खरं तर आपला आवाज हीच आपली ताकद असते.

समाजात वावरत असताना आवाजामुळे आपली कामे सोप्पी होतात. परंतु काही लोकांना याचे महत्व समजत नाही आणि तंबाखू, धुम्रपान, ड्रग्ज आणि मोठमोठ्याने ओरडणे, अशा अनेक कारणांनी ते आपला बहुमूल्य आवाज गमवतात.

आवाज दिनाचा इतिहास- राष्ट्रीय आवाज दिन हा १९९९मध्ये सर्वप्रथम ब्राझीलमध्ये सुरु करण्यात आला. ब्राझीलमधील व्हॉईस हेल्थ प्रोफेशनल्सच्या गटाने या दिवसाची सुरुवात केली.

१६ एप्रिल १९९९ रोजी डॉ. नेडिओ स्टीफन यांच्या अध्यक्षतेखालील ब्राझिलियन सोसायटी ऑफ लॅरींगोलॉजी अँड व्हॉईसने हा दिवस ब्राझिलियन व्हॉइस डे म्हणून घोषित केला. यानंतर २००२ मध्ये अमेरिकन ॲकॅडमी ऑफ ऑटोलॅरिन्गोलॉजिस्ट-हेड अँड नेक सर्जरीने हा दिवस जागतिक आवाज दिन म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली.

**महत्त्व आणि उद्दिष्ट्य :** खरं तर आपला आवाज ही देवाने दिलेली अनोखी देणगी आहे आणि याच गोष्टीची जाणीव लोकांना व्हावी यासाठी जागतिक आवाज दिन साजरा करण्यास सुरुवात करण्यात आली. या दिवशी आरोग्याच्या महत्त्वाविषयी जनजागृती करण्यात येते. अनेक लोक दारू पिऊन, धुम्रपान करून, किंवा मोठमोठ्याने ओरडून आपल्या आवाजाचा चुकीचा वापर करतात.

दुसरीकडे काही चांगल्या सवयी पाळल्या तर नक्कीच तुम्ही तुमच्या आवाजावर मात सुद्धा करू शकता. त्यामुळे आजच्या दिवशी अनेक डॉक्टर आणि संशोधक आवाजाशी संबंधित समस्यांवर काम करणाऱ्या लोकांशी चर्चा करून यावर मात करण्याचा प्रयत्न करत असतात.

आवाजाच्या बाबतीत अनेक गैरसमज लोकांना असतात. हे गैरसमज दूर होणे अत्यंत गरजेचे आहे. रोजच्या जगण्यात आवाजाकडे आपण तितकेसे लक्ष देत नाही. मात्र आवाजावर नक्की कसा ताण पडतो आणि त्याची काळजी घ्यायला हवी हेदेखील महत्त्वाचे आहे.

आवाजाच्या बाबतीतल अनेक गैरसमज डॉ. शमा कोवळे, कन्सल्टंन्ट ईएनटी, कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल, मुंबई यांनी दूर केले आहेत आणि तुम्हालाही याबाब जाणून घेण्याची गरज सांगितली आहे.

**गैरसमज :** १) कुजबुजणे चांगले असते कारण त्यामुळे तुमच्या आवाजाला जरा आराम मिळतो. सत्यः खरे तर कुजबुजल्यामुळे तुमच्या स्वर पटाचे-वोकल फोल्ड नुकसान होते. आवाजात कर्कशपणा असेल किंवा आवाज बदलत असेल तर कुजबुजल्यामुळे स्वर पटांवर ताण पडतो कारण ते पूर्णपणे जवळ नसतात त्यामुळे आवाज निर्माण करण्यासाठी अधिक जास्त जोर लावावा लागतो. त्यामुळे जर आवाजाला आराम द्यायचा असेल तर अजिबात बोलू नका.

२) आपण आपल्या डायाफ्रामपासून गातो. सत्यः आपण आपल्या श्वासाच्या मदतीने गातो. तुमचा श्वास जितका चांगला असेल तितके चांगले तुम्ही गाऊ शकता. तुमच्या डायाफ्रामपासून गा असे जेव्हा सांगितले जाते तेव्हा त्याचा अर्थ होतो की ओटीपोटात श्वास घेऊन गा आणि श्वास गाण्यास मदत करतो.

३) जर आवाज बसला असेल तर चोखून खाण्याच्या गोळ्या किंवा कफ ड्रॉप घेतल्यास बरे वाटते. सत्यः चोखून खाण्याच्या गोळ्या, मेंथलेटेड कफ ड्रॉप्स हे तुमच्या आवाजासाठी हानिकारक असतात. मेंथॉलमुळे वेदना तात्पुरत्या थांबतात आणि आराम मिळाल्यासारखे वाटते. त्यामुळे खरेतर आवाज बसलेला असताना देखील तुम्ही बोलू लागता, अशाने आवाजाला जास्त त्रास होतो.

(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)

■ ■ ■

# रोज एक डाळिंब खाल्ल्याने आरोग्याला मिळतील आश्चर्यकारक फायदे



डाळिंब खाणे आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानले जाते. त्यामुळे अनेकजण त्यांच्या आहारात अनेक हेल्दी पदार्थांचा समावेश करत असतात. तुम्ही जर रोज फळांचे सेवन करत असाल तर त्यात तुमच्या उत्तम आरोग्यासाठी रोज एक डाळिंबाचे सेवन करा. त्यातच आपण एक डाळिंब शंभर आजारी अशी म्हण आपण अनेकदा ऐकली असेल, पण हे फळ आपल्याला आजारी पाडत नाही तर अनेक आजारांपासून संरक्षण करते.

डाळिंब हे केवळ चवीलाच चविष्ट नाही तर आरोग्यासाठीही खूप फायदेशीर आहे. पण, अनेकांना हे माहित नाही की जर आपण दररोज एक डाळिंब खाल्ले तर त्याचा आपल्या शरीरावर काय परिणाम होईल.

**अशक्तपणा सारख्या आजारांवर मात करते**

तज्ज्ञांच्या मते, डाळिंबामध्ये व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन के, फायबर, पोटॅशियम आणि लोह मुबलक प्रमाणात आढळते. हे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते आणि सर्दी आणि खोकल्यासारख्या किरकोळ समस्यांपासून संरक्षण करते. डाळिंबाचे नियमित सेवन केल्याने अशक्तपणा दूर होतो आणि शरीरात ऊर्जा टिकून राहते.

**हृदयरोगांवर प्रभावी**


हृदयरोगांमध्येही डाळिंब खूप फायदेशीर आहे. यामध्ये असलेले पॉलीफेनॉल आणि अँटीऑक्सिडंट्स रक्तदाब नियंत्रित करतात. हे कोलेस्टेरॉल कमी करण्यास देखील मदत करते.

डाळिंबाचा रस त्वचेला चमकदार बनवतो आणि केसांना मजबूत करतो. त्याचबरोबर डाळिंबाच्या सेवनाने पचनसंस्था मजबूत करण्यासाठी आणि बद्धकोष्ठता सारख्या समस्या दूर करण्यासाठी प्रभावी आहे.

**मधुमेहावर गुणकारी :** डाळिंबाच्या बियांमध्ये मधुमेहविरोधी गुणधर्म असतात, ते मधुमेही रुग्णांसाठी कोणत्याही औषधापेक्षा कमी नाही. ते थेट खाणे चांगले आहे, जेणेकरून भरपूर फायबर शरीराला मिळते. परंतु जर तुम्ही डाळिंबाचा रस काढल्यानंतर प्यायले तर रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यास खूप मदत होईल.

**गरोदरपणात उपयुक्त :** डाळिंबात अँटिऑक्सिडंट गुणधर्म आढळतात, ज्याद्वारे गर्भधारणेदरम्यान प्लेसेंटाचे संरक्षण होते. या फळामध्ये असलेले फोलेट स्त्रीच्या पोटात वाढणाऱ्या मुलाच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. ■ ■

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### देख भाई देख ..!

एक नंबरची माणसं
दोन नंबरचे करती धंदे
म्हणून तर होऊन राहीले
देशात भौ समदे वांदे ..!

कारनामे त्यांचे जेव्हा
येतात चव्हाट्यावर
तो मी नव्हेच म्हणून
हात ठेवतात कानावर . . !

गुंड भ्रष्टाचारी नेत्यांचा
कराल पर्दाफाश
तेंव्हाच भारत मातेचा
होईल मोकळा श्वास .. !



[illegible]



[illegible]


## आज का अंदाज

बुधवार १६ एप्रिल २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ६ | ३ | ५ | ७ | ९ |
| २३६ | १३८ | १५८ | २६८ | १३९ | १६८ | २५० | १८० |
| ५६० | २०० | ३४७ | ३३० | २३८ | ३५७ | ३४० | ४५० |
| ४७० | ११० | २४८ | २५९ | ३३७ | २४९ | ८९० | ३६० |
| १२ | २३ | ४१ | ६२ | ३१ | ५२ | ७३ | ९१ |
| १५ | २५ | ४५ | ६४ | ३४ | ५६ | ७४ | ९५ |
| १८ | २६ | ४८ | ६७ | ३९ | ५८ | ७६ | ९६ |


**१६ एप्रिल : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | ४१ | ५३ | ६२ |
| २५ | ४३ | ५४ | ६४ |
| २६ | ४६ | ५८ | ६३ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## शब्दकोडे क्रमांक २०८६



**आडवे शब्द :-**


१) भारतात चार दिशांना चार मठ स्थापन करणारे पहिले हिंदू धर्मगुरु
६) जन्म-मृत्यू
९) युक्ती
१०) विद्यादान करणारा
११) बातमी
१३) टपाल
१४) मधमाशी
१७) खीर, दूध
२१) सगळीकडे
२३) फणसाचा एक प्रकार
२६) गव्हाची एक उत्कृष्ट जात
२७) नुकसान सोसावे लागणे (वा.प्र.)
३०) पदरावरती जरतारीचा ** नाचरा हवा, आई मला नेसव शालू नवा!
३१) माझा
३२) स्तुती करणारा
३४) करपलेला भाग
३६) राबता
३८) सिद्धता
४०) नस, धमनी
४२) सत्वांश
४४) उकल, स्पष्टीकरण
४५) अभंगातील जनाबाई
४६) चाणक्यनीती
४९) एक चतुर्थांशाचा पाढा
५०) छोटा
५२) प्रत्येक गावात
५४) तात्काळ
५६) अटीची भाषा
५८) चाकर
६०) टिकून राहणे
६१) फुरसत
६३) पार्वतीनंदन
६५) व्यापारी फायदा
६६) नदीचा काठ
६७) मृत्युदेवता
६८) सर्वात खालचे पाताळ

**उभे शब्द :-**

१) द्वेष
२) गौरी-हर
३) मडके
४) मीठ
५) सूत काढण्याची फिरकी, लोखंडी सळई
६) कथिल व शिसे यांच्या पासून बनलेला एक धातू
७) मऊ
८) साधारण
१०) फक्त, केवळ
१२) मक्षिका
१३) फिकीर
१५) श्रेष्ट, अग्रभाग, जबाबदारी
१६) संथ चालणारा उभयचर प्राणी
१८) जेथे (सं)
१९) सूत, धागा तयार करण्याचे एक साधन
२०) मरणोन्मुख
२१) कारण
२२) जमिनीखाली येणारे फळ
२३) संकट
२४) व्यवस्थापक, कारभार पाहणारा
२५) उपकार
२७) उद्याच्या नंतरचा दिवस
२८) सीतापती
२९) पाण्याची लहर
३०) भुरळ घालणारी स्त्री
३३) रंग बदलणारा प्राणी
३५) रुधिर
३६) भावाची पत्नी
३७) टवटवीत
३९) चिखलाची भुसभुशीत जमीन
४१) सवाद्य मिरवणूक
४३) सदोदित
४४) आडवेच्या विरुद्ध
४६) सज्जन
४७) बेदाणे
४८) अश्रुंनी डोळे भरणे
५१) सोने
५२) गावठी
५३) वीरमरण
५५) कोलकाताचे विमानतळ
५७) आवड, द्रव
५९) अर्धा किलो
६२) उम्र
६३) हत्ती
६४) बाण

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



> महत्त्वाचे

## हद्दपार असलेला इसम नाशिकमध्ये वावरताना आढळला; गुन्हा दाखल

**सिडको ।** नाशिक शहरातून हद्दपार करण्यात आलेला एक इसम आज शहरात वावरताना आढळून आल्यामुळे गुन्हे शाखा युनिट-१ च्या अधिकाऱ्यांनी त्याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. अल्ताफ अलिम सय्यद (वय २६ , रा. त्रिमूर्ती चौक, सिडको, नाशिक) असे या इसमाचे नाव आहे. अंबड येथील बडदेनगर परिसरातील ७ स्टार बेकरीजवळ पोलीस निरीक्षक महेश वसंत साळुंके यांनी गस्त घालण्याच्या दरम्यान अल्ताफ सय्यद हा संशयितरित्या वावरताना पाहिला. त्याची चौकशी केली असता तो तडीपार असल्याचे स्पष्ट झाले. अल्ताफ सय्यद यास दोन वर्षांसाठी नाशिक शहर व नाशिक जिल्ह्याच्या हद्दीबाहेर ठेवण्याचे आदेश दिले होते. मात्र, त्याने हा आदेश पायदळी तुडवत नाशिक शहरात प्रवेश केला. या प्रकारामुळे पोलीस प्रशासनाने तत्काळ कारवाई करत अल्ताफ सय्यद याच्याविरोधात सदर हद्दपार आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी संबंधित कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकारामुळे गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींवर पोलिसांची नजर असून, शहराच्या सुरक्षेच्या दृष्टीने अशा प्रकारच्या कारवाया सुरूच राहतील, असे गुन्हे शाखेकडून सांगण्यात आले. या प्रकरणाचा पुढील तपास गुन्हे शाखा युनिट- १ करत आहे.

## सराईत गुन्हेगार प्रणव उर्फ अमीन बोरसे विरोधात गुन्हा

**सिडको ।** अंबड परिसरात शस्त्रसाठा बाळगल्याच्या प्रकरणात गुंडा विरोधी पथकाने मोठी कारवाई करत दोन तरुणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. विनापरवाना चार लोखंडी कोयते जवळ बाळगल्याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात आर्म ॲक्ट कलम ४/२५ आणि महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. ही कारवाई १४ एप्रिल रोजी सकाळी ५.२५ वाजता अंबड येथील वावरे नगरमधील साई समृध्दी रो हाऊस परिसरात करण्यात आली. गुन्हा दाखल करण्यात आलेले आरोपी म्हणजे प्रणव उर्फ अमीन तुकाराम बोरसे (वय ३४ वर्षे, रा. वावरे नगर, अंबड) आणि शादीक शब्बीर शेख (वय २१ वर्षे, रा. काबंळेवाडी, सातपूर, नाशिक) हे दोघे असून त्यांच्यावर गंभीर स्वरूपाचा शस्त्रसाठा बाळगल्याचा आरोप आहे.गुंडा विरोधी पथकाचे पोलीस शिपाई कल्पेश राजेंद्र जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रणव बोरसे याच्या घराजवळ संशयास्पद हालचाली दिसून आल्याने पोलिसांनी तपासाची दिशा त्या परिसराकडे वळवली. तपासादरम्यान बोरसेच्या ताब्यातून चार धारदार लोखंडी कोयते हस्तगत करण्यात आले. प्रत्येक कोयत्याची किंमत अंदाजे १००० असून एकूण किंमत ४००० इतकी आहे. प्रणव बोरसे याने पोलिसांना चौकशीदरम्यान सांगितले की, सदर कोयते त्याने आरोपी शादीक शेख याच्याकडून घेतले होते. मात्र या शस्त्रांसाठी त्यांच्याकडे कोणताही कायदेशीर परवाना नव्हता. या घटनेमुळे अंबड परिसरात खळबळ उडाली असून, पोलीस प्रशासनाकडून अशा प्रकारच्या अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे गुन्हे शाखेने स्पष्टकेले आहे.

## शस्त्रबंदी आदेशाचे उल्लंघन; धारदार चॉपरसह इसमास अटक

**सिडको ।** अंबड परिसरात शस्त्रबंदी आदेश असतानाही धारदार चॉपर बाळगणाऱ्या एका इसमाविरुद्ध अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीकडून शस्त्रासह मोपेड वाहनही जप्त करण्यात आले आहे. ही कारवाई अंबड पोलिसांनी दिनांक १४ एप्रिल सायंकाळी केली. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव राजेश अंकुश डोंगरे (वय चाळीस वर्षे, रा. घरकुल योजना, चुंचाळे शिवार, अंबड, नाशिक) असे आहे. घरकुल योजना परिसरात तो संशयितरित्या फिरत असताना एमआयडीसी चुंचाळे पोलिस चौकीचे पोलीस शिपाई अर्जुन कांदळकर यांनी त्याला थांबवून तपासणी केली. तपासणीदरम्यान आरोपीकडे एक धारदार लोखंडी चॉपर आढळून आला. तसेच आरोपीकडे वीस हजार रुपये किमतीची हिरो डेस्टिनी मोपेड देखील आढळून आली. याप्रकरणी आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास अंबड पोलीस करीत आहेत.

## 'संथारा' अर्थात 'मृत्यू महोत्सव' ३२ वा दिवस

**पुणे ।** महा साध्वीजी परमपूज्य डॉक्टर प्रियदर्शनाजी महाराज साहेब यांचा जागरूक सहज संथारा व्रताचा आज ३२ वा दिवस आहे. 'संथारा' अर्थात 'मृत्यू महोत्सव! वयोवृद्ध जैन साध्वी जी परमपूज्य प्रियदर्शनाजी महाराज साहेब वय वर्ष ८६ पुणे कोथरूड येथील जैन स्थानकात संथारा व्रत घेऊन आपला मृत्यू महोत्सव साजरा करत आहेत. त्या स्वतः उच्चशिक्षित आहेत जैन साधना पद्धतीमध्ये त्यांनी पीएचडी संपादित केली आहे. 'नमो सिद्धाय' या विषयावर विशेष अभ्यास करून त्यांना डी लीट पदवी देऊन त्यांचा सन्मान करण्यात आलेला आहे त्यांच्या दर्शनासाठी हजारो जैन श्रद्धाळू कोथरूड येथे एकत्र होत आहेत, तरी सर्वांनी त्यांच्या दर्शनाचा लाभ घ्यावा.



# कोण आहे त्र्यंबक नगर परिषदेचा 'लाडका ठेकेदार'?

## कुंभमेळ्याच्या दृष्टीने त्र्यंबकमध्ये सुरू असलेल्या कामांच्या चौकशीची मागणी

**नाशिक ।** त्र्यंबक नगरपरिषद सध्या एका 'लाडक्या ठेकेदारावर' मेहरबान असून नगर परिषदेची कोट्यवधी रुपयांची कामे याच ठेकेदारालाच मिळत असल्याने त्रंबक नगर परिषदेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. आगामी कुंभमेळ्याच्या दृष्टीने त्रंबकच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाने तब्बल ८६० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून या कामांची मलई वरपण्यासाठी लाडक्या ठेकेदारांकडून जोरदार फील्डिंग लावली जात आहे. दरम्यान या ठेकेदाराकडून निकृष्ट दर्जाची कामे होत असल्याचा आरोप करीत या संपूर्ण कामांची चौकशी करण्याची मागणी केली जात आहे.

त्र्यंबकमध्ये अलीकडच्या काळात विशिष्ट ठेकेदाराचा मोठा बोलबाला असून त्र्यंबक नगर परिषद या ठेकेदारांवर अधिकच मेहरबान झाल्याचे दिसून येत आहे. त्र्यंबक मध्ये सुरू असलेली कोट्यवधी रुपयांची कामे वेगवेगळ्या एजन्सीच्या नावे दिली जात असून मात्र या सर्वांच्या वतीने एकच ठेकेदार काम करत असल्याचा आरोप त्रंबकवासियांनी केला आहे. त्रंबक नगरपरिषदेकडून निघणाऱ्या कोट्यवधी रुपयांच्या निविदा देखील मॅनेज होत असल्याचा आरोप असून तडजोड करणाऱ्या एजन्सीलाच कामांची वर्क ऑर्डर दिली जात असल्याचे बोलले जाते.मात्र प्रत्यक्षात काम करणारे ठेकेदार निराळेच आहेत. या ठेकेदाराकडून होत असलेली कामे देखील नियमबाह्य पद्धतीने होत असून कामांचा दर्जा देखील निकृष्ट असल्याचा आरोप केला जात आहे. सध्या त्र्यंबकेश्वर शहरात अतिक्रमणाचा मुद्दा गंभीर बनल्याचे दिसत असताना दुसरीकडे मर्जीतील ठेकेदारांनी नगरपरिषदच हायजॅक




केल्याचे दिसून येत आहे. नगरपरिषदेत सातत्याने येणारी मंडळी कोण आहे त्यांचे नगरपरिषदेत काय काम आहे. हे देखील तपासण्याची मागणी त्रंबकवासियांकडून केली जात आहे.

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या दृष्टीने त्रंबकच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाने तब्बल ८६० कोटी रुपयांचा मास्टर प्लॅन तयार केला असून या आराखड्यात सिंहस्थ पूर्व आणि सिंहस्थानंतर अशी कामांची विभागणी केली आहे. पहिल्या टप्प्यात दर्शन पथ आणि गावठाणाच्या रस्त्यांचे नूतनीकरण,नव्याने विकसित होणाऱ्या भागातील रस्ते, पाणीपुरवठ्याचा वाढीव प्रकल्प,कायमस्वरूपी सार्वजनिक शौचालय उभारणी,आधुनिक वाहनतळे, भाजी मार्केटची उभारणी या कामांचा समावेश करण्यात आला आहे. या कामांसाठी किमान १८ ते २० महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता असल्याने या कामांना प्राथमिक दृष्ट्या प्राधान्य देण्यात आले आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या दृष्टीने तब्बल ८६० कोटी रुपयांची कामे प्रस्तावित असल्याने लाडक्या ठेकेदारांना जास्तच उकळ्या फुटल्या असून ही कामे आपल्यालाच मिळावी यासाठी आत्तापासूनच जोरदार लॉबिंग सुरू असल्याचे बोलले जाते. त्यामुळे आगामी सिंहस्थ काळात त्रंबक मध्ये ठेकेदारराज येणार असल्याचे दिसून येते. त्रंबक मधील काही विशिष्ट ठेकेदारांवर त्र्यंबक नगर परिषदेचे वरिष्ठ अधिकारी मेहरबान असून कामांमध्ये देखील अधिकाऱ्यांची छुपी भागीदारी असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. हा संपूर्ण प्रकार अत्यंत गंभीर असून सिंहस्थ कुंभमेळ्याच्या कोट्यवधी रुपयांच्या कामांच्या दृष्टीने नगर परिषदेत सुरू असलेली कामे कुणाच्या नावावर आहे? सदरची कामे संबंधित नेमून दिलेली एजन्सीच करीत आहे का? या दृष्टीने वरिष्ठ पातळीवर सखोल चौकशी करण्याची मागणी केली जात आहे.

# गुंडगिरीला आळा घालून व्यावसायिक, कर्मचाऱ्यांसाठी भयमुक्त वातावरण निर्माण करावे

## फेडरेशन ऑफ ऑटोमोबाईल डिलर्स असोसिएशनचे पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांना निवेदन

**नाशिक ।** गैरमार्गातील व्यक्ती सर्रासपणे शोरुममध्ये प्रवेश करतात, कर्मचार्यांना धमकावतात व दबावतंत्राचा वापर करुन चुकीच्या पद्धतीने अवास्तव मागण्या करतात. यामुळे डिलर्स, कर्मचारी यांच्यामध्ये भितीचे वातावरण आहे. अशा गुंडगिरीला आणि झुंडगिरीला आळा घालताना व्यावसायिक व कर्मचार्यांसाठी भयमुक्त वातावरण शहरात निर्माण करावे, अशी मागणी फेडरेशन ऑफ ऑटोमोबाईल डिलर्स असोसिएशन यांच्या वतीने पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांना केली आहे. संघटनेच्या शिष्टमंडळाने मंगळवारी (१५ एप्रिल) श्री.कर्णिक यांची भेट घेत निवेदन दिले.



'आम्ही ग्राहकांना सर्वोत्तम सेवा देण्यासाठी बांधिल आहोत. परंतु अशा अपप्रवृत्तींकडून टाकला जाणारा दबाव कुठल्याही परीस्थितीत खपवून घेतला जाणार नाही. ग्राहकांची काही तक्रार असेल तर त्यांनी रितसर कंपनीकडे किंवा पोलिस ठाण्यात, ग्राहक प्राधिकरणाकडे कायदेशीरमार्गाने नोंदवावी. अशा प्रकारे गैरकायद्याच्या व्यक्तींच्या भुलथापांना बळी पडत कायदा हातात घेऊ नये' असे आवाहन यानिमित्त संघटनेच्या पदाधिकार्यांनी केले. यावेळी शिष्टमंडळाने विविध मुद्यांवर चर्चा केली. नुकताच घडलेल्या निर्भय पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या घटनेचा संदर्भ पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांना देण्यात आला. संबंधितांनी अनाधिकृतपणे दालनात प्रवेश केला. व प्रवेश करताना सोशल मिडीयाचा वापर करुन कंपनी, वितरक व कर्मचारी यांची बदनामी सुरु केली. गेल्या महिन्यात जितेंद्र भावे हे दालनात आले होते. तर तीन दिवसांपूर्वी राजेंद्र गायधनी नामक कार्यकर्त्याने हैदोस घातला. या संपूर्ण प्रकारामुळे व्यावसायिक व कर्मचार्यांमध्ये भितीचे वातावरण आहे. संबंधितांनी धमकावलेला कर्मचारी आजारी पडला असून, त्याच्या कुटुंबातील सदस्यदेखील तणावाखाली आहेत. अशा प्रकारे कर्मचारी दबावात येऊन नोकरी सोडत आहेत. तर काही दडपणाखाली काम करत आहेत. त्यामुळे या अपप्रवृत्तींना आळा घालतांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करुन देण्याची मागणी यावेळी केली. तसेच सदरच्या घटनेचा सखोल तपास करुन दोषींवर कठोर व कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी यावेळी केली. निवेदन देताना सचिन महाजन, गणेश शिरोडे, मीनल चौधरी, सोनल चौधरी, हेमंत चोपडा, सुमित पटवा, दिनेश वर्हाडे, ओम मोहरीर, प्रितेश शहा, राकेश चव्हाण, जय पटवा आदी उपस्थित होते.

> “ नुकताच घडलेला प्रकार निंदनीय असून, आम्ही सर्व सदस्य या घटनेचा निषेध करतो. ग्राहकांना सेवा देण्यासाठी आम्ही बांधिल आहोत. परंतु ग्राहकांनीदेखील कायदेशीर मार्गाने आपली मागणी मांडावी. अशा अपप्रवृत्तींचा दबाव कुठल्याही परीस्थितीत खपवून घेतला जाणार नाही. पोलिस प्रशासनाला कठोर कारवाईची विनंती केली आहे.
>
> – **सर्व पदाधिकारी, फेडरेशन ऑफ ऑटोमोबाईल डिलर्स असोसिएशन**

# 'ऑपरेशन मेघदूत' : भारतीय लष्करी दलांचे अदम्य साहस

**१३ एप्रिल रोजी ऑपरेशन मेघदूतला ४१ वर्ष पूर्ण झाली त्या निमित्ताने...**

भारताच्या लष्करी इतिहासात अनेक धाडसी मोहीमांनी आपला ठसा उमटवला आहे आणि त्यातील एक महत्त्वपूर्ण मोहीम म्हणजे ऑपरेशन मेघदूत! ही मोहीम भारताच्या तिन्ही लष्करदलांनी – विशेषतः भारतीय सैन्य आणि हवाई दलाने– संयुक्तरीत्या राबवलेली एक अत्यंत महत्त्वाची आणि ऐतिहासिक कारवाई होती. ऑपरेशन मेघदूत १३ एप्रिल १९८४ रोजी सुरू करण्यात आले आणि यामध्ये भारताने जगातील सर्वात उंच रणभूमी असलेल्या सियाचिन हिमनगावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. या मोहिमेने भारताच्या लष्करी क्षमतेचा, धोरणात्मक दूरदृष्टीचा आणि जवानांच्या अपार धैर्याचा परिचय संपूर्ण जगाला दिला. सियाचिन हिमनग हा काराकोरम पर्वतरांगेतील एक दुर्गम आणि अत्यंत थंड परिसर आहे. येथे तापमान -५० अंश सेल्सियसपर्यंत खाली जाते, आणि या ठिकाणी श्वास घेणे देखील कठीण असते. १९७० च्या दशकात पाकिस्तानने सियाचिन परिसरात हळुहळू घुसखोरी करण्याचा प्रयत्न सुरू केला होता. त्यांनी या भागात अनेक आंतरराष्ट्रीय गिर्यारोहक मोहिमा आयोजित करून आपल्या नियंत्रणाचा आभास निर्माण करण्याचा डाव खेळला. भारताला पाकिस्तानच्या या हालचालींची माहिती मिळाल्यानंतर, भारतीय लष्कराने पुढाकार घेऊन या भागावर आधीच ताबा मिळवण्याचा निर्णय घेतला. ऑपरेशन मेघदूतची आखणी अत्यंत गुप्ततेने करण्यात आली होती. हिमालयातील अत्यंत प्रतिकूल हवामानात सुद्धा भारतीय जवानांनी अवघड चढाई करत, हेलिकॉप्टरच्या सहाय्यानेह उपकरणे आणि अन्न पुरवठा करत सियाचिनच्या प्रमुख ठिकाणांवर आपले तंबू आणि चौक्या उभारल्या. यामुळे पाकिस्तानच्या योजना उधळून लागल्या आणि भारताने संपूर्ण सियाचिन ग्लेशियरवर यशस्वीरित्या आपला ताबा मिळवला. या मोहिमेचे महत्त्व केवळ लष्करी दृष्टिकोनातूनच नाही, तर धोरणात्मक आणि भौगोलिक-दृष्ट्याही खूप मोठे आहे. सियाचिनचा भूभाग पाकिस्तान आणि चीनच्या सीमेवर असल्याने तो भारताच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील आहे. या भागावर नियंत्रण मिळविल्यामुळे भारताने पाकिस्तानच्या संभाव्य आग्रही हालचालींना रोख लावला आणि आपली भौगोलिक बाजू बळकट केली. ऑपरेशन मेघदूत ही मोहीम म्हणजे केवळ रणांगणावरील विजय नव्हे, तर ती भारताच्या जवानांच्या अपार शौर्याची, बलिदानाची आणि राष्ट्रभक्तीची साक्ष आहे. सियाचिनच्या बर्फाच्छादित रणभूमीवर भारतीय जवान आजही उणे तापमानात, जीवघेण्या परिस्थितीत देशाच्या सीमांचे रक्षण करत आहेत. त्यांच्या या सेवेमुळे आपण सुरक्षित आहोत. म्हणूनच ऑपरेशन मेघदूतचा अभ्यास करणे म्हणजे भारताच्या लष्करी इतिहासातील एक प्रेरणादायी पर्व उलगडणे होय –ज्यातून धैर्य, निष्ठा आणि राष्ट्रासाठी बलिदान देण्याची वृत्ती शिकण्यास मिळते. सियाचिन प्रदेश हा भारतासाठी सामरिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा आहे, कारण हा भाग पाकिस्तानला चीनशी थेट भूसीमारेषा जोडण्यापासून रोखतो. दुसरीकडे, पाकिस्तानसाठी हा भाग थेट प्रवेशद्वारासारखा आहे, ज्यामुळे त्यांना जम्मू आणि काश्मीरवर दावा करण्यास बळ मिळते. सियाचिनवरील वाद फाळणीच्या वेळी सीमारेषा नीट न ठरल्यामुळे निर्माण झाला. भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांनी या भागातील वाद नियंत्रणात ठेवण्यासाठी आणि शांतता राखण्यासाठी अनेक करार केले. १९४९ मध्ये भारत-पाकिस्तान युद्धानंतर दोन्ही देशांनी "कराची करार" केला. या करारानुसार एक युद्धविराम रेषा (Ceasefire Line) आखली गेली. पण त्यात सियाचिन प्रदेशाचा बराचसा भाग स्पष्टपणे नमूद केला गेला नव्हता. ही युद्धविराम रेषा NJ 9842 या नकाशातील बिंदूवर संपते, NJ-9842 हा एक महत्त्वाची भौगोलिक बिंदू (Grid Reference Point) आहे, जो भारत-पाकिस्तान नियंत्रण रेषेच्या (Line of Control - LoC) संदर्भात अत्यंत महत्त्वाचा मानला



जातो. हा बिंदू जम्मू आणि काश्मीरच्या उत्तरेकडील भागात, सियाचिन ग्लेशियरच्या दक्षिणेकडे आहे. जो चीनच्या सीमेपासून सुमारे ६० किमी दक्षिणेला आहे. कारण हा भाग, विशेषतः सियाचिन हिमनदी, अतिशय दुर्गम होता, त्यामुळे तो नकाशावर स्पष्टपणे दाखवण्यात आला नाही. आंतरराष्ट्रीय सीमा अखनूर येथे संपली होती आणि तिथून युद्धविराम रेषा आखण्यातब आली होती. १९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धानंतर "ताशकंद करार" झाला, जो भारताचे पंतप्रधान लालबहादुर शास्त्री आणि पाकिस्तानचे राष्ट्रपती अयुब खान यांच्यात झाला. या करारानुसार 0युद्धविराम रेषेला "लाइन ऑफ कंट्रोल" (LOC) असे नाव देण्यात आले, आणि सियाचिनला "नो मॅन्स लँड" (कोणत्याही देशाचा ताबा नसलेला भाग) घोषित करण्यात आले. भारताचा दावा होता की, LOC ही NJ 9842 पासून थेट उत्तरेला जाते, तर पाकिस्तानचा दावा होता की ती पूर्व-उत्तरेला जाऊन काराकोरम खिंडीकडे वळते. या वेगवेगळ्या व्याख्यांमुळे दोन्ही देशांनीह सियाचिन हिमनदीवरील निर्जन आणि बर्फाच्छादित भागावर आपला दावा सांगितला, मात्र १९८४ पर्यंत हा भाग दोन्ही देशांच्या लष्करांनी ताब्यात घेतलेला नव्हता. पाकिस्तानने या दावाहीन भागाकडे एक संधी म्हणून पाहिले, कारण हा भूभाग सामरिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आणि अद्याप कोणाच्याही ताब्यात नव्हता. त्यामुळे, सियाचिन हिमनदीवर पाकिस्तानचा ताबा बसू नये म्हणून भारताने ऑपरेशन मेघदूत सुरू केले. १९७० च्या दशकात कर्नल नरिंदर कुमार, जे भारतीय लष्करातील एक शिस्तप्रिय अधिकारी व गिर्यारोहक होते, यांनी काश्मीरचा एक अमेरिकन-निर्मित नकाशा पाहिला ज्यामध्ये सियाचिन हिमनदीचा भाग पाकिस्तानमध्ये दाखवण्यात आला होता. पाकिस्तानने अनेक गिर्यारोहण मोहिमांना सियाचिन भागातील शिखरे पाकिस्तानच्या बाजूने सर करण्यासाठी फक्त परवानगीच दिली नाही तर या मोहिमांना पाकिस्तान सरकारकडून परवाने दिले जात असे आणि सहसा पाकिस्तान लष्कराचा एक अधिकारी या मोहिमांमध्ये सोबतसुद्धा असे. या गिर्यारोहकांना पाकिस्तान सैन्याने दिलेला नकाशा (जो जर्मन मोहिमेतील एका सदस्याकडून भारतीय गुप्तचर संस्थांना मिळाला) सियाचिनलाह पाकिस्तानचा भाग दाखवतो आणि LOC ला NJ-9842 पासून काराकोरम खिंडीपर्यंत जोडतो. या कारामातीला उत्तर म्हणून भारतीय लष्कराने या भागाचा अभ्यास करण्यासाठी परवानगी घेतली. कर्नल बुल कुमार यांच्या नेतृत्वाखाली १९७८ मध्ये मोहिमब राबवण्यात आली आणि १९८१ पर्यंत त्यांनी संपूर्ण सियाचिन हिमनदीचा चीनच्या सीमेपर्यंत नकाशा तयार केला, तसेच साल्टोरो पर्वतरांगांपलीकडील भागाचे फोटो आणि व्हिडिओ गोळा केले. १९८४ मध्ये भारतीय गुप्तचर



संस्थांना पाकिस्तानकडून "अबाबील" नावाच्या मोहिमेची योजना असल्याचे समजले आणि त्यांनी लंडनमधून मोठ्या प्रमाणात अंटार्क्टिक वस्त्र, हिमालयी तंबू आणि गिर्यारोहण साहित्य खरेदी केल्याचेही लक्षात आले. या गुप्तचर अहवालाच्या आधारावर तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी ऑपरेशन मेघदूतसाठी परवानगी दिली. भारत सरकारकडून हिरवा कंदील मिळाल्यानंतर, तेव्हाचे लष्करप्रमुख जनरल अरुण वैद्य यांनी उत्तर लष्कर कमांडर लेफ्टनंट जनरल पी.एन. हूण आणि ब्रिगेडियर विजय चन्ना यांना साल्टोरो रांगा तात्काळ ताब्यात घेण्याचे आदेश दिले. ही योजना कॅबिनेट कमिटी ऑन सेक्युरिटीमध्ये मांडली गेली आणि पंतप्रधान इंदिरा गांधींनी तिला तात्काळ मंजुरी दिली. सियाचिन हिमनदीवर ऑपरेशन मेघदूतची जबाबदारी कुमाऊँ रेजिमेंटच्या एका बटालियनवर सोपवण्यात आली. त्यांना लडाख स्काउट्सच्या एका कंपनीने आणि कुमाऊँच्या आणखी दोन कंपन्यांनी पाठिंबा दिला. संपूर्ण हिमवस्त्र आणि सुसज्ज उपकरणांनी सज्ज कुमाऊँ रेजिमेंट आणि लडाख स्काउट्सचे जवान सियाचिन बेस कॅम्पवर जमले. या मोहिमेपूर्वी, सैनिकांनी कठोर प्रशिक्षण घेतले, ज्यामध्ये हिमावर जिवंत राहण्याचे कौशल्य, बर्फावर चढाई (स्नो क्राफ्ट, आइस क्राफ्ट), आणि मानसिक व शारीरिक तयारी यांचा समावेश होता. ऑपरेशन मेघदूतचे नेतृत्व मेजर आर.एस. संधू यांनी केले. भारतीय हवाई दलाच्या IL-76 आणि AN-32 ट्रान्सपोर्ट विमानांनी लेह येथे मोठ्या प्रमाणात लॉजिस्टिक सामग्री पोहोचवली. यानंतर, कॅप्टन संजय कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखालील पुढील भारतीय सैन्य दलाने सियाचिन हिमनदीवर उतरणी केली आणि बिलाफोंड ला या महत्त्वाच्या दर्र्यावर हिंदुस्थानी निशाण फडकविले. अतिशय कमी वेळात, भारतीय लष्कराने सिया ला, बिलाफोंड ला आणि ग्योंग ला हे तीन प्रमुख दर्रे आणि साल्टोरो रांगेवरील प्रमुख उंच शिखरे ताब्यात घेतली. जेव्हा पाकिस्तानी सैन्य तिथे पोहोचले, तेव्हा त्यांना मोठा धक्का बसला आणि भारतीय लष्कराच्या जोरदार प्रतिकारात त्यांना मोठ्या प्रमाणात नुकसान सहन करावे लागले. नंतर, पाकिस्तानने पश्चिम भागातील रांगेवर कब्जा केला, जिथून त्यांना भारतीय संरक्षण व्यवस्थेचा आढावा घेता येत होता आणि त्यांनी तेथून भारतीय तळावर हल्ला चढवला. यानंतर दोन्ही बाजूंनी जोरदार गोळीबार झाला आणि शेवटी पाकिस्तानी सैनिकांना माघार घ्यावी लागली आणि त्यांनी ती रांग रिकामी केली. जर सियाचिन पाकिस्तानच्या ताब्यात गेला असतात तर त्यांनी लडाखमधील भारतीय लष्करी हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी रडार व निरीक्षण केंद्रे उभारली असती. यामुळे चीन आणि पाकिस्तान यांच्यात समन्वय निर्माण होऊन, कोणत्याही संघर्षाच्या वेळी संयुक्त हल्ला करण्याची शक्यता वाढली असती. सियाचिनवरील नियंत्रणामुळे भारतीय लष्कराला नुब्रा खोऱ्यात संरक्षणात्मक पायाभूत सुविधा उभारण्याची गरज भासली नाही, जे अत्यंत खर्चिक ठरले असते. हा भाग लेहकडे जाणाऱ्या मार्गांचे संरक्षण करतो, जे लडाखचे प्रमुख शहर आणि प्रशासकीय केंद्र आहे.

सियाचिन क्षेत्र काराकोरम खिंडीजवळ आहे, ज्यामार्गे काराकोरम महामार्ग जातो आणि तो पाकव्यवस्थापित काश्मीरमधील गिलगिट-बाल्टिस्तान भागाला चीनच्या झिंजियांग प्रांताशी जोडतो. सियाचिन एक प्रकारचा "निगराणी टॉवर" (watchtower) म्हणून कार्य करतो, ज्यामुळे भारताला पाकिस्तानच्या गिलगिट आणि बाल्टिस्तान भागांवर लक्ष ठेवता येते. ऑपरेशन मेघदूत हे एक असे मिशन होते, ज्याचे सियाचिन क्षेत्रावर अनेक परिणाम झाले. यामुळे भारताला जम्मू आणि काश्मिरवर आपली स्थिती मजबूत करण्याची संधी मिळाली, आणि पाकिस्तानच्या या प्रदेशावर असलेल्या दाव्याला नैतिक पराभव मानले गेले. तरीही, आजही प्राकृतिक आपत्ती आणि प्रतिकूल वातावरण पाकिस्तानला सियाचिनवर पुनःप्रयत्न करण्यापासून रोखू शकलेले नाहीत, आणि यामुळे भारताला आपल्या सैनिकांची आणि उपकरणांची देखभाल करण्यासाठी उच्च खर्च करावा लागतो. हा भाग इतका प्रतिकूल आहे की ऑपरेशन मेघदूतदरम्यान शहीद झालेल्या सैनिकांच्या अवशेषांचा शोध फक्त ३८ वर्षांनी २०२२ मध्ये अनपेक्षितपणे लागला. तथापि, गेली ४१ वर्ष भारतीय सैनिकांचा निर्धार अत्यंत मजबूत आहे, जे त्यांच्या सतत उपस्थिती आणि ताब्याच्या ठिकाणी नियंत्रण ठेवण्यात दिसून येते हे त्यांच्या अविचल निष्ठेचे आणि जिद्दीचे प्रतीक आहे. ऑपरेशन मेघदूतचा सारांश सियाचिन बेस कॅम्पवरील एक स्मारक करत करत दिला जाऊ शकतो, ज्यावर योग्यपणे लिहिले आहे. "हिमात कडवटलेले, शांत राहाणारे, जेव्हा तुरुंग वाजेल, तेव्हा ते उठतील आणि पुन्हा चालतील!"

**लेखक- योगेश अशोक चकोर**
**शिक्षक तथा एनसीसी अधिकारी**
**भोंसला मिलिटरी स्कूल, नाशिक तसेच**
**संशोधक विद्यार्थी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,**
**जळगाव, मो. ८१४९८८९७४**






डॉ. महेश दळे

डॉ. कुंदन गायकवाड





डॉ.अजेय गर्जे



डॉ. प्रसन्न नेने



डॉ.अजिक्य बोऱ्हाडे





## झोपेशी तडजोड नको

नवसंशोधन

अपुऱ्या झोपेच्या दुष्परिणामांबाबत बरंच सांगितलं आणि बोललं गेलं आहे. सहा तासांपेक्षा कमी झोप घेणं काहीजणांना महागात पडू शकतं.



मधुमेही, उच्च रक्तदाबाचे रुग्ण, हृदयविकार तसंच पक्षाघाताच्या रुग्णांनी पुरेशी झोप घ्यायलाच हवी. अन्यथा, अशा रुग्णांना कॅन्सर होण्याची शक्यता असते, असं एका संशोधनातून समोर आलं आहे. कमी झोपेमुळे तुम्ही इतर काही विकारांना बळी पडू शकता. त्यामुळे पुरेशी झोप घ्या. झोपेबाबत कोणतीही तडजोड करू नका.

## दुर्लक्ष पडेल महागात

दंतारोग्य

दातांकडे, तोंडाच्या आरोग्याकडे लक्ष देणं गरजेचं असतं, हे अनेकांच्या गावीही नसतं. मध्यंतरी केलेल्या सर्वेक्षणातून ही बाब समोर आली आहे. भारतीय लोक तोंडाच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. यामुळे बरेच दंतविकार जडू शकतात. त्यातच



मधुमेह आणि दंतविकार यांचा खूप जवळचा संबंध असतो. भारत ही मधुमेहाची राजधानी बनत चालल्यामुळे दातांकडे केलेलं दुर्लक्ष महागात पडू शकतं.

## नियमित तपासणी गरजेची

डोळ्यांचे आरोग्य

डोळ्यांची नियमित तपासणी गरजेची आहे कारण प्रत्येक नेत्रविकाराची लक्षणं दिसून येत नाहीत. त्यामुळे दोन ते तीन महिन्यांनी डोळ्यांची तपासणी करून घ्यायला हवी. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ज्येष्ठांनी डोळ्यांची जास्त काळजी घेणं गरजेचं आहे. वय वाढू




लागल्यावर नेत्रविकार डोकं वर काढू लागतात. त्यामुळे डोळ्यांच्या कोणत्याही तक्रारींकडे दुर्लक्ष होता कामा नये.

महासागर

नाशिक

# शेअर बाजारात तुफानी तेजी; सेन्सेक्स 1500 पेक्षा जास्त अंकांनी वधारला, निफ्टी 23,300च्या पार





**मुंबई, दि. १५ प्रतिनिधी**

आज शेअर बाजारात प्रचंड तेजी दिसून आली. निफ्टी ५० निर्देशांक ५०० अंकांनी किंवा २.१९ टक्क्यांनी वाढून २३,३२८.५५ वर बंद झाला, तर सेन्सेक्स १,५७७.६३ अंकांनी किंवा २.०९% च्या वाढीसह ७६,७३४.८९ वर बंद झाला. ट्रम्प यांनी नवीन टॅरिफ धोरण ९० दिवसांसाठी थांबवल्यानंतर ही वाढ नोंदवण्यात आली आहे. आजच्या व्यवहारात, सर्व क्षेत्रीय निर्देशांक हिरव्या रंगात बंद झाले आणि निफ्टी ऑटो आणि निफ्टी मेटल निर्देशांकांमध्ये जोरदार तेजी दिसून आली.

मंगळवारी, इंडसइंड बँकेच्या शेअर्समध्ये निफ्टी ५० पॅकमध्ये सर्वात मोठी वाढ दिसून आली आणि ६.७३ टक्क्यांच्या नेत्रदीपक वाढीसह ७३५.९० रुपयांवर बंद झाला. यानंतर, श्रीराम फायनान्सचे शेअर्स ५.२०% ने वाढून ६७२ रुपयांवर बंद झाले, तर टाटा मोटर्सचे शेअर्स ४.५७% ने मजबूत होऊन ६२२.२० रुपयांवर बंद झाले. याशिवाय, एल अँड टी चे शेअर्स ४.५५% वाढून ३२५८ रुपयांवर बंद झाले, तर अदानी एंट. चे शेअर्स ४.१७% च्या वाढीसह २४१८ रुपयांवर बंद झाले.

आजच्या व्यवहारात निफ्टी ५० निर्देशांकातील घसरत्या समभागांवर नजर टाकली तर, फक्त दोन समभाग लाल रंगात बंद झाले. आयटीसीचे शेअर्स ०.२८% ने घसरून ४२०.४० रुपयांवर बंद झाले, तर एचयूएलचे शेअर्स ०.२०% च्या किंचित कमकुवततेने २३६२ रुपयांवर बंद झाले. उर्वरित ४८ कंपन्यांच्या शेअर्समध्ये वाढ झाली आहे. आजच्या व्यवहार सत्रात सर्व क्षेत्रीय निर्देशांक वाढीसह बंद झाले. निफ्टी ऑटो इंडेक्स ३.३९% वाढीसह २१,२४६ वर बंद झाला. निफ्टी मेटल ३.२०% वाढून ८,४३० वर बंद झाला. निफ्टी बँक २.७०% वाढून ५२,३८० च्या पातळीवर बंद झाला. निफ्टी फार्मा

**सेन्सेक्स 76,734**

**निफ्टी 23,328**

२.२०% च्या वाढीसह २०,९१२ च्या पातळीवर बंद झाला आणि निफ्टी आयटी निर्देशांक १.६३% च्या वाढीसह ३३,२७५ च्या पातळीवर बंद झाला.

दरम्यान, दिग्गज रिसर्च फर्म मॉर्गन स्टॅनलीच्या विश्लेषकांनी डिसेंबर २०२५ पर्यंत सेन्सेक्ससाठी त्यांचे लक्ष्य १२ टक्क्यांनी कमी करून ८२,००० केले आहे. पूर्वी ते ९३,००० रुपये ठेवण्यात आले होते. तसेच, हे लक्ष्य सध्याच्या पातळीपेक्षा सुमारे ७% जास्त आहे आणि ते पूर्ण होण्याची शक्यता ५० टक्के असल्याचा अंदाज आहे. मॉर्गन स्टॅनली येथील इक्विटी रिसर्च आणि स्ट्रॅटेजिस्ट (इंडिया) प्रमुख रिधम देसाई यांनी उपासना चाचरा, बानी गंभीर आणि नयनत पारिख यांच्यासोबत संयुक्तपणे लिहिलेल्या एका अहवालात हा अंदाज मांडला आहे. हा अंदाज भारतात व्यापक पातळीवर स्थिरता राहील या गृहीतकावर आधारित आहे. यामध्ये मजबूत राजकोषीय धोरण, खाजगी गुंतवणुकीत वाढ आणि वास्तविक विकास दर आणि व्याजदरांमधील सकारात्मक फरक यांचा समावेश आहे.

# केंद्र -तामिळनाडू संघर्ष उफाळण्याची चिन्हे

## राज्य स्वायत्ततेबाबत उपाययोजनांसाठी समिती

**चेन्नई, दि. १५ वृत्तसंस्था**

तामिळनाडूच्या स्वायत्ततेबाबत उपाययोजनांची शिफारस करण्यासाठी आज मुख्यमंत्री एमके स्टॅलिन यांनी सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश कुरियन जोसेफ यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती स्थापन केली. ही समिती संघराज्याशी संबंधित सर्व पैलूंचा अभ्यास करेल. तसेच तामिळनाडूच्या घटनात्मक हक्कांचे रक्षण करण्यासाठी शिफारसी करेल," अशी घोषणाही त्यांनी विधानसभेत केली.

स्टॅलिन म्हणाले की, राज्य स्वायत्ततेबाबत उपाययोजनांची शिफारस करण्यासाठी आम्ही समिती स्थापन करत आहोत. तामिळनाडूसह सर्व राज्यांच्या हक्कांचे रक्षण करणे हे यामागील उद्दिष्ट आहे. समवर्ती यादीतील विषय परत मिळविण्यासाठी उपाययोजनांची शिफारस करण्याचे काम या समिती करेल. सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायाधीश कुरियन जोसेफ यांच्या अध्यक्षतेखाली समितीमध्ये माजी सनदी अधिकारी अशोक शेट्टी आणि नागराजन यांचा समावेश आहे. ही समिती जानेवारी २०२६ पर्यंत अंतरिम अहवाल सादर करेल. तसेच २०२८ पर्यंत अंतिम अहवाल सादर करावा लागेल, असेही त्यांनी स्पष्ट केले. हिंदी भाषेतून शिक्षणावरून तामिळनाडूतील सत्ताधारी द्रमुक आणि भाजपच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारमधील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर हे महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.

**काय आहे तामिळनाडू सरकारची मागणी?**

स्टॅलिनच्या नेतृत्वाखालील द्रमुक सरकारचे नीट, भाषा धोरण, कुलगुरूंची नियुक्ती आणि सीमांकन यासह अनेक प्रमुख मुद्द्यांवर मोदी सरकारशी संघर्ष सुरु आहे. शिक्षणाचा समावेश समवर्ती यादीत आहे. याचा अर्थ शिक्षण विभाग हे राज्ये आणि केंद्र यांच्याकडून प्रशासित केले जाते. परंतु श्री. स्टॅलिन यांनी शिक्षण विभाग हा केवळ राज्याचा विषय असावा, अशी मागणी केली आहे. शिक्षणाचा समवर्ती यादीत समावेश करण्यासाठी भारतीय राज्यघटनेतील ४२ व्या दुरुस्तीला रद्द करण्याची मागणीही त्यांनी



केली आहे. तसेच केंद्र सरकार भारताची संघराज्य रचना पद्धतशीरपणे कमकुवत करत आहे. अनेक महत्त्वाच्या बाबींवर केंद्र सरकार राज्याच्या अधिकारांना दुर्लक्षित करत आहे, असा आरोपही त्यांनी यावेळी केला

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी तामिळनाडू विधानसभेने दोनदा मंजूर केलेले विधेयक नाकारल्यानंतर NEET वाद चिघळला होता. वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी राज्याला बारावीच्या गुणांच्या आधारे प्रवेश घेण्याची परवानगी देण्यात यावी, अशी विनंती आमची विनंती केंद्र सरकारने नाकारली आहे. या प्रश्नी आमचा लढा अद्याप संपलेला नाही. या निर्णयाला आव्हान कसे द्यायचे याबद्दल आम्ही कायदेशीर तज्ञांचा सल्ला घेऊ," असे स्टॅलिन यांनी यावेळी स्पष्ट केले.

तामिळनाडू आणि केंद्र यांच्यातील वादाचा आणखी एक प्रमुख मुद्दा म्हणजे राष्ट्रीय शिक्षण धोरणातील तीन-भाषिक सूत्र. याला द्रमुकने आक्षेप घेतला आहे. विद्यमान द्विभाषिक धोरणाने भारतीय अर्थव्यवस्थेत दुसऱ्या क्रमांकाचे योगदान देणाऱ्या राज्याची प्रगीती केली आहे. तसेच तीन-भाषिक धोरणाच्या अंमलबजावणीस विरोध केल्यानेच केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्यावर शिक्षण निधीतील २,५०० कोटी रुपये रोखण्याची धमकी देऊन 'ब्लॅकमेल' करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोपही तामिळनाडू सरकारने केला आहे.

**स्टॅलिन यांचा निर्णय करुणानिधी यांच्या १९६९ च्या निर्णयाशी समांतर**

स्टॅलिन यांनी राज्यांच्या हक्कांसाठी स्थापन केलेली समिती ही माजी मुख्यमंत्री एम. करुणानिधी यांनी १९६९ मध्ये घेतलेल्या एका निर्णयाशी समांतर असल्याचे मानले जात आहे. एम. करुणानिधी यांनी तामिळनाडू विधानसभेत राज्य स्वायत्ततेचा ठराव मंजुरीसाठी मांडला होता. या ठरावतील मुद्द्याची तपासणी करण्यासाठी निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती. १९७४ मध्ये एका ठरावाद्वारे या समितीने सुचवलेले निष्कर्ष स्वीकारण्यात आले होते.

# सलमान खानला धमकी देणारा तरुण गुजरातमधून ताब्यात

**वडोदरा, दि. १५ वृत्तसंस्था**

सलमान खानला जीवे मारण्याची धमकी देणारा तरुण २६ वर्षांचा असून त्याला पोलिसांनी वडोदरा मधून ताब्यात घेतले आहे. सलमान खानची गाडी बॉम्बने उडवून देण्याची धमकीही त्याने दिली होती. ट्रॅफिक पोलिस विभागाला व्हॉट्सॲपवर एक मॅसेज मिळाला होता, ज्यामध्ये त्याची कार बॉम्बने उडवून देण्याची आणि घरात घुसून मारण्याची धमकी दिली होती. शिवाय, वरळी पोलिस ठाण्यातही एक कॉल आला होता. त्या फोन कॉलच्या आधारावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या धमकी केसमध्ये २६ वर्षीय एका तरुणाला गुजरातच्या वडोदरामधून पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.



सूत्रांनुसार, त्या तरुणाची मानसिक स्थिती ठिक नसल्याचे म्हटले जात आहे. लवकरच मुंबई पोलिस लवकरच त्याची चौकशी करणार असल्याचे म्हटले जात आहे. सध्या पोलिस तपास करत आहेत.

सलमान खानला ही धमकी त्याच्या गॅलॅक्सी अपार्टमेंटच्या घराबाहेर गोळीबाराच्या घटनेनंतर एक वर्षांनी देण्यात आली होती. १४ एप्रिल २०२४ रोजी सलमान खानच्या गॅलेक्सी अपार्टमेंट बाहेर ४ राउंड फायरिंग झाले होते. लॉरेन्स गँगने या हल्ल्याची जबाबदारी घेतली होती.

सलमान खानला मारण्याची धमकी मिळाल्यानंतर त्याची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. त्याला Y+ सिक्युरिटी मिळाली असून त्याच्या गॅलॅक्सी अपार्टमेंटच्या बाहेरही सुरक्षा कडक करण्यात आली आहे.

# डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे आदिवासी गर्भवती महिलेचा मृत्यू

**गडचिरोली, दि. १५ वृत्तसंस्था**

देसाईगंज तालुक्यातील विसोरा येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रातील डॉक्टर आणि परिचारिकेच्या अक्षम्य निष्काळजीपणामुळे आदिवासी समाजातील एका गर्भवती महिलेला जीव गमवावा लागल्याची संतापजनक घटना घडली. मनिषा शत्रुघ्न धुर्वे असे मृत महिलेचे नाव आहे. दरम्यान, शिवसेना नेते सुरेंद्रसिंह चंदेल यांच्या नेतृत्वात शिवसैनिकांनी आज देसाईगंज येथील ग्रामीण रुग्णालयापुढे आंदोलन करीत दोषी डॉक्टर आणि परिचारिकेला निलंबित करेपर्यंत मृतदेह नेणार नाही, अशी भूमिका घेतल्याने तणाव निर्माण झाला आहे.

विसोरा येथील मनिषा धुर्वे हिची पहिलीच प्रसूती होती. त्यासाठी तिला १३ एप्रिलला गावातीलच प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात भरती करण्यात आले. तपासणी केल्यानंतर बराच वेळ होऊनही मनिषाची प्रसूती झाली नाही. त्यामुळे मनिषाच्या कुटुंबीयांनी रुग्णवाहिका बोलावून तिला देसाईगंज येथील ग्रामीण रुग्णालयात हलविण्याचा निर्णय घेतला. मात्र, विसोरा येथील उपकेंद्रातील डॉक्टर गणेश मुंडले आणि परिचारिका उके यांनी 'आणखी थोडा वेळ थांबा, मनिषाची प्रसूती येथेच होईल', असे तिच्या कुटुंबीयांना सांगून रुग्णवाहिका परत पाठवली.



परंतु, तब्बल १२ तास उलटूनही मनिषा प्रसूत झाली नाही. शेवटी तिला ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. तेथील डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर त्यांनीही प्रसूती होईल, असे सांगितले. परंतु प्रसूती न झाल्याने मनिषाच्या कुटुंबीयांना १४ एप्रिलच्या संध्याकाळी तिला ब्रम्हपुरी येथील खासगी रुग्णालयात हलविले. मात्र, डॉक्टरांनी मनिषाला मृत घोषित केले. तिच्या बाळाचाही पोटातच मृत्यू झाला. त्यानंतर आज देसाईगंज येथे मनिषाचे शवविच्छेदन करण्याची प्रक्रिया सुरु झाली. तेथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे माजी जिल्हाप्रमुख सुरेंद्रसिंह चंदेल, माजी उपजिल्हाप्रमुख अविनाश गेडाम, शहरप्रमुख विकास प्रधान, डिंपल चावला, जसपालसिंह चावला, सचिन राऊत, हितेश किलनाके आणि गावकऱ्यांनी आंदोलन करीत दोषी डॉक्टर आणि परिचारिकांना निलंबित करेपर्यंत मृतदेह नेणार नाही, अशी भूमिका घेतल्याने तणाव निर्माण झाला.

या घटनेसंदर्भात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रताप शिंदे यांना विचारणा केली असता त्यांनी, या घटनेची जिल्हा माता व बालसंगोपन अधिकाऱ्यांमार्फत चौकशी सुरु असून, आपणही स्वत: जाऊन माहिती जाणून घेतली आहे. मुख्य कार्यपालन अधिकाऱ्यांशी चर्चा केली असून, डॉक्टर आणि परिचारिका दोषी आढळल्यास त्यांच्यावर कारवाई करु, असे सांगितले.

# बलात्कार प्रकरणी अलाहाबाद हायकोर्टाच्या 'त्या' टिप्पणीवर सुप्रीम कोर्टाने नोंदवला आक्षेप

**नवी दिल्ली, दि. १५ वृत्तसंस्था**

एका बलात्कार प्रकरणात अलाहाबाद उच्च न्यायालयाने पीडितेला कथित गुन्ह्यासाठी जबाबदार धरत संशयित आरोपीला जामीन मंजूर केला होता. त्यावेळी न्यायाधीशांनी केलेल्या टिप्पणीवर सर्वोच्च न्यायालयाने आक्षेप नोंदवला आहे. तसेच न्यायाधीशांनी बोलताना काळजी घेतली पाहिजे, असेही स्पष्ट केले आहे.

एका विद्यापीठाच्या विद्यार्थिनीने आरोप केला होता की, तिला एका बारमध्ये भेटलेल्या एका तरुणानेने ती दारूच्या नशेत असताना तिच्यावर बलात्कार केला. तर, आरोपीने जामीन अर्जात म्हटलं होतं की, महिलेने स्वतः त्याच्यासोबत जाण्यास सहमती दर्शविली होती. त्यानंतर संहमतीने लैंगिक संबंध झाले होते. अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायाधीश संजय कुमार सिंह यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी सुरू होती. आरोपीला ११ डिसेंबर २०२४ रोजी अटक करण्यात आली. आरोपीला जामीन मंजूर करताना न्यायाधीश संजय कुमार सिंह यांनी म्हटले होतं की, "तरुणीने स्वतःच संकटाला आमंत्रण दिले होते. या कथित घटनेसाठी ती जबाबदार आहे."

जामीन मंजूर करणे हा प्रत्येक प्रकरणातील तथ्यांवर अवलंबून न्यायाधीशांचा विवेक असला तरी, तक्रारदाराविरुद्ध असे अनावश्यक निरीक्षण टाळले पाहिजे, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. अलाहाबाद उच्च न्यायालयाने पीडित मुलीच्या पायजम्याची दोरी तोडून तिला ओढून नेण्याचा प्रयत्न करणे बलात्काराचा प्रयत्न नाही, असे ठरवलेल्या एका प्रकरणाच्या स्वतःहून केलेल्या खटल्याच्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने हे निरीक्षण नोंदवले.

बलात्कार प्रकरणी जामीन मंजूर केला जाऊ शकतो; पण 'तिने स्वतःच संकटांना आमंत्रण दिले' अशी टिपण्णी कशी काय होवू शकते? विशेषतः न्यायाधीशांनी असे बोलताना काळजी घेतली पाहिजे," असे न्यायमूर्ती गवई यांनी नमूद केले.

# अत्याचाराचं प्रतीक असलेली हुमन्स इन उना कलाकृती

कल्पना करा कि तुम्ही प्रथमच एखाद्या आर्ट गॅलरीमध्ये चित्र पाहण्यासाठी गेलेला आहात,आणि तिथे एक तरुण आपल्या पायाचे अंगठे धरून उभा आहे. त्याच्या पाठीवर एकावर एक असे बांधून ठेवलेले मातीचे गाठोडे आहे. आणि त्या तरुणाच्या बाजूला काळ्या रंगाची भुकटी आणि काठी आहे. कुणीतरी येत आहे आणि त्या तरुणाला तो कला रंग लावत आहे आणि त्या काठीने त्याला अब्दत आहेत. एकामागून एक असे सर्वजण येऊन त्याला बडवत आहेत. ज्या गोष्टीचे हे वर्ण आहे तेच प्रभाकर कांबळे यांच्या हुमन्स इन उना या नावाजलेल्या एका कलाकृतीचं सादरीकरण आहे. २०१६ साली गुजरातमधील उनामध्ये एका दलित कुटुंबातील सदस्यांना बेदम मारहाण करण्यात आली होती. त्यावरची प्रभाकर कांबळे यांची हि चित्ररूपी प्रतिक्रियाच होती.

समोर काठी असेल तर ती कुणाला तरी मारण्यासाठीच वापरली जाते आणि कला रंग असेल तर तो फासण्यासाठी वापरला जातो. समाजात सुद्धा हिंसा अशीच घडते. असा संदेश प्रभाकर कांबळे कलाकृतीद्वारे दर्शकांना देतात आणि अंतर्मुख करतात. प्रभाकर जी आपल्या चित्रकृतीतून केवळ अमूर्त गोष्टीच व्यक्त करत नाहीत तर एक खंबीर सामाजिक भूमिका देखील घेताना दिसतात. त्यांच्या कलेचा सारांश अगदी थोडक्या शब्दात मांडताना ते म्हणतात,''रस्त्याने जाताना आपल्याला कुणी साधा पत्ता विचारला तर आपण त्या व्यक्तीला थँक्यू म्हणतो आणि मग हजारो वर्षांच्या

**मुलखावेगळी माणसं**

पिढ्यानपिढ्याच्या गुलामीतून मुक्त करणाऱ्या व्यक्तीला आपण थँक्यू म्हणत नाही हे कसे?व्हिजुअल आर्टिस्ट प्रभाकर कांबळे यांनी यातूनच आपल्या कलाकृतीतून बाबासाहेब आंबेडकरांना मनापासून थँक्यू म्हटलं आहे. मागील ३९ वर्षांपासून प्रभाकर हे चित्र ,शिल्प अशा कलाकृतींचे अभिनव असे सादरीकरण करत आहेत. एक प्रकारे ते दृश्य कलाकार आहेत. सध्या ते एका चित्रपटावर काम करत आहेत. प्रभाकर




जी हे एक क्युरेटर देखील आहेत. क्युरेटर म्हणजे एक अशी व्यक्ती जी इतर कलाकाराच्या कला सादर करण्यासाठी एक संकल्पना घेऊन येतात. त्यात काय हवं नको ते पाहून मग त्या कलाकृतींचे आर्ट गॅलरीमध्ये साद्रीकरण केलेलं जाते. प्रभाकर यांचा पहिला स्वतंत्र शो २०२६ यामध्ये मुंबईतील जहांगीर आर्ट गॅलरीमध्ये झाला त्यानंतर जगभरात अनेक ठिकाणी त्यांच्या कलेचे सादरीकरण झालेले आहे. प्रभाकर यांची ओळख केवळ आंतराष्ट्रीय स्तरावर नावाजलेला एक कलाकार इतकीच नाही तर त्यांच्या सेक्युलर आर्ट मुव्हमेंट मधून ते देशभरातील अन्य कलाकारांना घेऊन एक प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देतात.दहावी झाल्यानंतर प्रभाकर यांनी साइन बोर्ड पेंटिंगची कामे देखील केली. त्यानंतर आर्ट डिप्लोमा करून प्रभाकर हे कलेचे शिक्षक म्हणून देखील काम करत राहिले. शिपकलेचे शिक्षण त्यांनी कोल्हापुरातील प्रसिद्ध शिल्पकार संजय ताडस्कर यांच्याकडे अनोपचारिक रित्या घेतले. प्रभाकर यांच्या कलाकृती आपल्या विचाराणा आव्हान देतात. कोरोनाच्या काळात अचानक लोकडाऊन लागल्यामुळे लाखो लोकांना स्थलांतर करावे लागले होते. यात पायी जाणाऱ्यांची संख्या अधिक होती. यावर प्रतिक्रिया म्हणून प्रभाकर यांनी ब्रोकन फूट हि कलाकृती सादर केली. हि कलाकृती म्हणजे एक लाकडी पायाचे दुभंगलेले शिल्प आहे. खरोखरच अन्याय अत्याचार झालेल्या शोषितांचे,दुःखितांचे दुःख आपल्या कलेच्या माध्यमातून व्यक्त करणारे प्रभाकरजी हे एक मुलखावेगळे समाजवादी वृत्तीचे ग्रेट कलाकार आहेत.

**लोकमानस**

## मर्सिडीज-बेंझ इंडियाची इनोव्हेशनसाठी डिपार्टमेंट फॉर प्रमोशन ऑफ इंडस्ट्री सोबत हातमिळवणी

भारतातील सर्वात लोकप्रिय लक्झरी कार उत्पादक मर्सिडीज-बेंझ इंडियाने भारत सरकारच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या उद्योग आणि अंतर्गत व्यापार संवर्धन विभाग



**चलती का नाम गाडी**

(DPIIT) सोबत एक सामंजस्य करार (MoU) केला आहे, ज्यामुळे भारतातील स्टार्टअप इकोसिस्टममध्ये नावीन्यपूर्णता, शाश्वतता, सामाजिक विकास आणि उद्योजकता वाढेल. या सहकार्याचे उद्दिष्ट उत्पादन स्टार्टअप्स, नवोन्मेषक आणि उद्योजकांच्या विकासाला गती देणे आहे, तंत्रज्ञान आणि शाश्वततेद्वारे सकारात्मक सामाजिक प्रभाव चालविण्याच्या मर्सिडीज-बेंझ इंडियाच्या वचनबद्धतेला बळकटी देणे आहे.ही भागीदारी भारत सरकारच्या उद्योजकीय परिसंस्थेला पाठिंबा देण्याच्या दृष्टिकोनाशी सुसंगत आहे, ज्यामध्ये संपूर्ण सामाजिक विकास, रस्ते सुरक्षा आणि पर्यावरणीय शाश्वतता यावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. या सामंजस्य करारांतर्गत, मर्सिडीज-बेंझ इंडिया स्टार्टअप्सना महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा, मार्गदर्शन, निधी प्रवेश आणि बाजारपेठेतील दुवे प्रदान करण्यासाठी DPIIT सोबत जवळून काम करेल.

स्टार्टअप इंडिया उपक्रमाचा फायदा घेऊन, DPIIT या उपक्रमाची पोहोच आणि दृश्यमानता वाढवेल, अधिक सहभाग आणि प्रभाव सुनिश्चित करेल.हा सामंजस्य करार मर्सिडीज-बेंझच्या नाविन्यपूर्णतेला आणि शाश्वततेला चालना देण्यासाठीच्या अढळ वचनबद्धतेला अधोरेखित करतो, त्याचबरोबर भारताच्या गतिमान स्टार्टअप इकोसिस्टमला पाठिंबा देत व्यापक सामाजिक विकासात योगदान देतो. या सहकार्याद्वारे, कंपनी देशाच्या आर्थिक आणि तांत्रिक प्रगतीमध्ये अर्थपूर्ण योगदान देण्याचे उद्दिष्ट ठेवते.

## वाढत्या तापमानाचा मत्स्य प्रजातीवर दुष्परिणाम होतो आहे का?

१] उन्मेष कोटकर [ अध्यक्ष मत्स्य व्यावसायिक संघटना मुंबई ]

हो जागतिक तापमान वाढीचा समुदतीतील मत्स्य प्रजातीवर नक्कीच वाईट परिणाम होताना दिसतो आहे. याचाच दुष्परिणाम म्हणजे कटला.

**वाद संवाद**

ढोमी,कोळंबी,सुरमई यासारख्या अनेक पारंपरिक माशांच्या जाती हळूहळू दुर्मिळ होताना दिसत आहेत. समुद्रामध्ये होणारे मोठ्या प्रमाणातील प्रदूषण देखील याला कारणीभूत आहे. आणि महत्वाचं म्हणजे सरकारने १ जून ते १५ ऑगस्ट या कलावधीत माशांचा प्रजोत्पादन काळ असल्यामुळे मासेमारीवर बंदी आणली असताना देखील अनेक मासेमार छुप्या मार्गाने मासेमारी करतात आणि माशांची अंडी नासवतात ज्यामुळे माशांच्या काही जाती या नामशेष होत आहेत. प्रचंड उष्णतामानामुळे समुदतीतील मासे हे पाण्यात तग धरत नाहीत. वर्षानुवर्षे हि समस्या गंभीर होताना दिसतेय.

२] शैला बच्छाव [ गृहिणी]

ग्लोबल वार्मिंग सारख्या तापमान वाढीच्या समस्येचा परिणाम हा शेतीच्या क्षेत्रावर जसा होतो आहे तसाच समुद्री जलाशयातील माशांवर देखील होतो आहे. हे खरं असलं तरी आता अगदी महाराष्ट्रातील जवळजवळ सर्वच जिल्ह्यांमध्ये गोड्यापाण्यात अशा प्रकारे माशांच्या विविध प्रकारच्या जातींची पैदास शेततळ्यांमध्ये करता येणे शक्य आहे. यामुळे माशांच्या दुर्मिळ जातींची पैदास करून त्यांना टिकवता येईल. शिवाय मासेमार करणाऱ्यांना आर्थिक उत्पन्न देखील मिळेल. बोकडाचे मटण,कोंबडीचे चिकन याप्रमाणेच महाराष्ट्रात मत्स्य खवय्ये मोठ्या प्रमाणात आहेत. म्हणूनच जागतिक तापमान वाढीच्या समस्येवर मात करण्यासाठी कृत्रिम तलावात माशांची शेती हि काळाची गरज आहे असं वाटत.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# ट्रम्प सरकारसमोर नासाही हतबल!

## भारतीय वंशाच्या अधिकाऱ्याला गमवावी लागली नोकरी





**फ्लोरिडा, दि. १५ वृत्तसंस्था**

अमेरिकन अंतराळ संस्थामध्ये कार्यरत असणाऱ्या भारतीय वंशाच्या नीला राजेंद्र यांना नोकरी गमावली लागली आहे. नासामध्ये विविधता, समता आणि समावेश विभागाच्या प्रमुखपदी त्या कार्यरत होत्या. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आदेशानुसार, देशभरातील सर्व 'विविधता' कार्यक्रम बंद करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या कार्यक्रमात सहभागी झालेल्यांच्या नियुक्त्या तात्काळ बंद करण्याचे आदेशही ट्रम्प सरकारने आहेत.

नॅशनल एरोनॉटिक्स अँड स्पेस ॲडमिनिस्ट्रेशन (नासा)ने मार्चमध्ये विविधता, समता आणि समावेश विभाग बंद केला; परंतु यावेळी नीला राजेंद्र यांच्यासाठी एक वेगळा नवीन विभाग तयार करण्यात आला. नीला राजेंद्र यांचे पद बदलून 'टीम एक्सलन्स अँड एम्प्लॉयी सक्सेस ऑफिसचे प्रमुख पद देण्यात आले होते. मात्र त्यांच्या कामाचे स्वरुप पूर्वी सारखेच होते.

'नासा'च्या जेट प्रोपल्शन लॅबोरेटरी (जेपीएल) च्या संचालक लॉरी लेशिन यांनी एक ईमेल पाठवला आहे. यामध्ये स्पष्ट करण्यात आले आहे की, "नीला राजेंद्र आता जेपीएलचा भाग नाहीत. त्यांनी आजवर आपल्या कार्याने नासासाठी मोठे योगदान दिले होते. त्याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतो. तसेच भविष्यासाठी त्यांना शुभेच्छा देतो." दरम्यान, आर्थिक कारणांमुळे नासाने गेल्या वर्षी विविधता, समता आणि समावेश विभागातील ९०० कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकले होते.

नीला राजेंद्र यांनी अनेक वर्षे नासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. 'स्पेस वर्कफोर्स २०३०' सारख्या मोहिमांना प्रोत्साहन दिले. नासामध्ये महिला आणि अल्पसंख्याकांचा सहभाग वाढवणे हा त्यांचा उद्देश होता.

# 50 लाखांच्या फसवणुकीनंतर वृद्ध दाम्पत्याची आत्महत्या

## गुजरातमधील एकाला अटक

**बेळगाव, दि. १५ वृत्तसंस्था**

कर्नाटकमधील बेळगाव जिल्ह्यात काही दिवसांपूर्वी एका वृद्ध दाम्पत्याने आत्महत्या केल्याची घटना समोर आली होती. त्यांची सायबर गुन्हेगारांकडून जवळपास ६० लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली होती. यानंतर त्यांनी टोकाचे पाऊल उचलले होते. दरम्यान या प्रकारणाचा तपास करत असलेल्या कर्नाटक पोलिसांनी आता याप्रकरणी गुजरात मधील एका व्यक्तीला अटक केली आहे. अटक केलेल्या आरोपीचे नाव हे चिराग जीवराज भाई लक्कड असे असून तो सूरतचा रहिवासी आहे.

२७ मार्च रोजी ८३ वर्षीय दियांगो नजरत आणि त्यांची पत्नी ७८ वर्षीय प्लेइवियाना नजरत ((७८) हे त्यांच्या बेळगाव येथील निवासस्थानी मृत अवस्थेत आढळले होते. दिओगजेरोन यांनी एक चिठ्ठी लिहून ठेवली होती ज्यामध्ये त्यांनी सायबर गुन्हेगारांकडून फसवले गेल्याचा दावा केला होता. मुंबई गुन्हे शाखेचे पोलीस असल्याचे भासवून सायबर गुन्हेगारांनी त्यांच्याकडून पैसे उकळल्याचा देखील त्यांच्या चिठ्ठीमध्ये उल्लेख करण्यात आला होता.

दरम्यान या प्रकरणाच्या तपासादरम्यान दियांगो यांनी कथितरित्या २२ बँक खात्यांमध्ये ५९.६३ लाख रुपये ट्रान्सफर केल्याची माहिती समोर आली होती.

या प्रकरणाच्या तपासाचा भाग असलेल्या एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, "अनेक व्यवहारांमधील आरटीजीएस व्यावहारापैकी ६,१०,००० रुपये हे बालाजी इंडस्ट्रीजच्या नावाने असलेल्या बँक खात्यात पाठवण्यात आले होते. पण अद्याप आम्हाला हे खाते असलेली कोणतीही नोंदणीकृत फर्म आढळली नाही." "लक्कड याने या फर्मच्या अकाउंटशी लिंक असलेले सिम कार्ड त्याच्या फोनमध्ये टाकले आणि नेटबँकिंगच्या माध्यमातून इतर दोन खाद्यात पैसे पाठवले. असे दिसते की तो एका मोठ्या टोळीचा भाग आहे आणि कमिशनसाठी काम करत होता," असे पोलीस अधिकाऱ्याने सांगितले. तसेच त्यांनी या आरोपीला न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात असल्याचीही माहिती यावेळी दिली.

दियांगो हे मुंबईतील सचिवालयात काम करत होते आणि निवृत्त झाल्यानंतर ते बेळगाव येथील बिडी गावात स्थायिक झाले होते. पोलीसांनी असेही सांगितले की त्यांनी दोन मित्रांकडून ५ लाख रुपये आणि एका पुजाऱ्याकडून ५०,००० रुपये उसणे घेतले होते आणि ७.१५ लाख रुपयांचे गोल्ड लोनही घेतले होते.

# श्रेयस अय्यर दुसऱ्यांदा ठरला 'ICC प्लेयर ऑफ द मंथ'



**दुबई, दि. १५ वृत्तसंस्था**

आयसीसीने मंगळवारी मार्च २०२५ महिन्यासाठीच्या सर्वोत्कृष्ट पुरुष आणि महिला खेळाडूंच्या नावांची घोषणा केली. टीम इंडियाचा मधल्या फळीतील स्फोटक फलंदाज श्रेयस अय्यर याने मार्च महिन्यातील प्रतिष्ठेचा 'आयसीसी प्लेयर ऑफ द मंथ' पुरस्कार जिंकला. त्याने दुसऱ्यांदा हा पुरस्कार जिंकला आहे. याआधी त्याला २०२२ मधील फेब्रुवारीत हा पुरस्कार मिळाला होता. विशेष म्हणजे भारताने सलग दुसऱ्यांदा या पुरस्कारावर नाव कोरले. याआधी फेब्रुवारीत शुभमन गिल प्लेयर ऑफ द मंथ ठरला होता. श्रेयस अय्यरने पुरुष खेळाडूंच्या यादीत न्यूझीलंडच्या जेकब डफी आणि रचिन रवींद्र जोडीला मागे टाकत हा पुरस्कार जिंकला.

श्रेयस अय्यरने भारताला चॅम्पियन ट्रॉफी जिंकून देण्यास महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्याने मार्च महिन्यात एकूण ३ एकदिवसीय सामने खेळले. त्यात त्याने ५७.३३ च्या सरासरीने १७२ धावा केल्या होत्या. त्याने चॅम्पियन्स ट्रॉफीतील न्यूझीलंड विरुद्धच्या ग्रुप ए मधील एका सामन्यात ७९ धावा आणि उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलिया विरुद्ध ४५ धावांची खेळी केली होती. त्याने अंतिम सामन्यात न्यूझीलंड विरुद्ध ४८ धावा करत भारताला चॅम्पियन ट्रॉफी जिंकून दिली.

तर सर्वोत्कृष्ट महिला खेळाडू म्हणून ऑस्ट्रेलियाची जॉर्जिया वोल हिची आयसीसी प्लेयर ऑफ द मंथ पुरस्कारासाठी निवड केली आहे. न्यूझीलंडविरुद्धच्या टी-२० सामन्यात तिने स्फोटक फलंदाजी केली होती.

वोल हिने तिच्याच देशाच्या (ऑस्ट्रेलिया) ॲनाबेल सदरलँड आणि अमेरिकेच्या चेतना प्रसाद यांना मागे टाकत प्लेयर ऑफ द मंथ पुरस्कारावर नाव कोरले. वोल ही प्लेयर ऑफ द मंथ पुरस्कार जिंकणारी सलग चौथी ऑस्ट्रेलियन महिला खेळाडू ठरली आहे.

**सी.आर.एम.आय.परळ**

सेंट्रल रेल्वे मेकॅनिक्स इंस्टीट्यूट परळ येथील मैदान जून २०२५ ते सप्टेंबर २०२५ पर्यंत तात्पुरते स्वरूपात भाडेतत्वावर देणे आहे. तरी इच्छुकांनी कार्यालयात येऊन भेट द्यावी.

सही/-
सचिव

महासागर NASHIK Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 'ANANDI', KOTWAL PARK, TILAKWADI, APP. VED MANDEER, DHAMANKAR CORNER, NASHIK 422002 , Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK Executive Editor- Sanju Pawar, Resident Editor- Jayant Mahajan.

महासागर नाशिक हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. प्रिंटर्स, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा, वैशाली नगर, दहिसर ईस्ट, मुंबई येथे मुद्रीत करून 'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२ . येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - संजू पवार (मो. नं. ९८९०१०९९७८) निवासी संपादक - जयंत महाजन (९४२०६९१४२०) Email : mumbaimahasagar@gmail.com